पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, एप्रिल २०२६, खंड २५, अंक १, पृष्ठे ५२

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक

३ ■ विद्रोह
५ ■ भारतातील कम्युनिस्ट पक्ष आणि ताश्कंत
१२ ■ युद्धप्रवणता आणि सायबर सुरक्षेचे आव्हान
१६ ■ प्रयोग, सूर्याचे किरण सूर्यालाच परत करण्याचा!

**पुरवणी**

२१ ■ बहुप्रतिक्षित भारतीय जनगणना – डॉ. अंजली राडकर

**उजळणी**

३० ■ (१) बुद्ध की कार्ल मार्क्स? – डॉ. बाबासाहेब आंबेडकर
४२ ■ (२) महात्म्याचा आकृतिबंध – रा. ग. जाधव

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/– रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **‘इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी’** या नावे पाठवावी. **त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**‘अर्थबोधपत्रिका’** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : ०२०-२५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेल : ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड २५ (अंक १)**
**एप्रिल २०२६**
**संपादक – अभय टिळक**
**सहयोगी संपादक – पराग पोतदार**

- **अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी ?**
- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

## अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी अनेक माहिती संदर्भासह पुरविणे.**

***अर्थबोधपत्रिका कशी साकारते ?***

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याल अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि / किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **‘अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने’** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

संपादकीय

# विद्रोह

अतिशय बलशाली अशी प्रस्थापित व्यवस्था संपूर्णतया नाकारणे, ही सोपी बाब नव्हे. त्याहीपुढे जाऊन, तशा त्या व्यवस्थेच्या ठिकाणी, तिला पर्याय म्हणून, दुसरी व्यवस्था निर्माण करण्यासारखे अ–साधारण कार्यकर्तृत्व केवळ अ–सामान्य प्रतिभाशाली लोकोत्तरच साकारू शकतात. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या लोकाग्रणींची गणना अशा लोकोत्तरांमध्ये म्हणूनच अतिशय स्वाभाविकपणे होते. महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष ११ एप्रिल २०२६ या दिवशी सुरू झाले. प्रस्थापित, प्रतिष्ठित आणि जिला धर्मव्यवस्थेचे बळकट अधिष्ठान लाभलेले आहे अशी या देशातील प्राचीन व्यवस्था ठामपणे नाकारून तिच्या ठायी पर्यायी व्यवस्था साकारण्याचे महत्कार्य या दोन पुरुषोत्तमांनी प्रचंड साहसपूर्ण उद्यमशीलतेने सिद्धीस नेले. त्यासाठी उदंड संघर्ष केला, सर्वस्व पणाला लावले. सत्यधर्माचे अधिष्ठान पुकारणारा महात्मा फुले यांचा सत्यशोधक समाजाचा प्रयोग निरामय मानवी समाजाचे चित्र समाजपुरुषाच्या पुढ्यात मांडणारा होता. तर, समतेचा आणि करूणेचा संदेश प्रगट करणारा बुद्धविचार वैश्विक समुदायाच्या जगण्याचा आधार बनावा, ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची तळमळ होती. एखादी प्राचीन परंपरा अथवा व्यवस्था तिच्याविरुद्ध उठाव करून नेस्तनाबूत करणे, एक वेळ तुलनेने सोपे असते. परंतु, तिच्या अस्तंगत होण्याने जी पोकळी समाजव्यवहारात निर्माण होते ती भरून काढण्यासाठी निरामय आणि निकोप अशी पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यास अ–साधारण प्रतिभा आणि प्रगल्भता यांची निकड असते. असे प्रतिभाशाली लोकनेते सर्वत्र सर्वकाळच दुर्मीळ असतात. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अ–साधारणत्व दृग्गोचर होते ते नेमके इथेच. ज्या तथाकथित वैदिक परंपरेद्वारे समाजव्यवस्थेत विषमतापूरक प्रवृत्तींना अधिमान्यता लाभत आलेली होती तिच्या विरोधात विद्रोहाचा स्वर या दोन महामानवांनी बुलंदपणे

उठवला. परंतु, त्याच वेळी, ती व्यवस्था पूर्णपणे नाकारत असताना तिच्या ठिकाणी एक पर्यायी व्यवस्था सादर करून आपल्या विद्रोहाची परिणती विद्वेषामध्ये घडून येऊ नये, याची पुरेपूर दक्षता या दोन्ही लोकाग्रणींनी त्यांच्या काळात पुरेपूर घेतली. फुले आणि आंबेडकर या उभयतांचे अ-साधारणत्व एकवटलेले आहे ते नेमके इथेच. महात्मा फुले यांचे ते असाधारणत्व विशद करणारा ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव यांचा लेख 'उजळणी'मध्ये पुनर्मुद्रित करण्यामागील हेतूदेखील तोच आहे. सगळे जगच २०२२ सालापासून युध्यमान परिस्थितीचा सामना करते आहे. युद्धासारख्या आक्रांतामध्ये चर्चा रंगते ती जित आणि जेत्यांच्या कहाण्यांची आणि त्यांनी राबविलेल्या व्यूह-प्रतिव्यूहांची, शत्रूला नामोहरम करण्यासाठी योजलेल्या डाव-प्रतिडावांची. परंतु, युद्धांमधील चढायांद्वारे ज्यांची आयुष्ये बरबाद होतात अशा निरपराध नागरिकांच्या हलाखीचे-हालअपेष्टांचे सोयरसुतक कोणालाही नसते. इराण-इस्त्रायल-अमेरिका यांच्या हाणामारीमध्ये लेबनन असो वा गाझापट्टी, तिथे राहणाऱ्या विद्यमान आणि भावी पिढ्यांची जी ससेहोलपट चालू आहे, तिची तमा ना आहे अमेरिकेला ना इस्त्रायलला. उभा जागतिक समुदायही हात चोळत बसलेला दिसतो. हा सारा आक्रांत मध्यपूर्वेतील ऊर्जास्त्रोतांवर नियंत्रण मिळवण्याच्या हव्यासाने उसळवलेला आहे, ही बाब सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ आहे. अशा या युद्धमय वातावरणात बुद्धाचे स्मरण तरी कोणाला होताना दिसते का? जगातील सर्व दुःखाचे मूळ मानवी तृष्णेमध्ये आहे, हा बुद्धविचाराचा आत्मा होय. तर, उभा मानवी लोकव्यवहार हा 'आहे रे' गटाकडून 'नाही रे' समूहाच्या केल्या जाणाऱ्या अव्याहत शोषणापायी पार नासून जातो, हे गाभातत्त्व कार्ल मार्क्स उच्चरवाने उद्घोषित करत राहिले. आजघडीला या दोन ज्ञानमहर्षींच्या विचारपाथेयाचे आपल्याला पूर्णतः विस्मरणच झालेले आहे. ***(पान ११ वर)***


## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

## नियामक मंडळ

१. **प्रा. डॉ. एस. श्रीरामन** (अध्यक्ष)
२. **प्रा. डॉ. रवींद्र ढोलकिया**
३. **प्रा. डॉ. सुरिंदरसिंग जोधका**
४. **डॉ. रमानाथ झा**
५. **प्रा. डॉ. सुहास पळशीकर**
६. **प्रा. डॉ. अंजली राडकर**
७. **श्री. अभय टिळक** (मानद संचालक)

# इतिहास

## भारतातील कम्युनिस्ट पक्ष आणि ताश्कंत

ब्रिटिश अंमलाखालील तत्कालीन हिंदुस्थानात २०व्या शतकाच्या पहिल्या पाव शतकात दोन संस्था म्हणा अथवा संघटना म्हणा, निर्माण झाल्या. स्थापनेचे वर्ष एकच असणे, हाच काय तो त्या दोहोंमधील एकमात्र समान धागा. अन्यथा स्थापनेमागील प्रेरणा, उद्दिष्टे, कार्यकक्षा, कार्याचे स्वरूप, विचारप्रणाली, धारणा, निष्ठा... अशा जवळपास सगळ्यांच बाबतीत त्या दोन संस्था परस्परांच्या एकदम विरुद्ध टोकांवर स्थित अशा. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही त्यांतील एक तर, भारतीय कम्युनिस्ट पक्ष ही त्यांतील दुसरी संघटना वा संस्था. दोन्ही संस्थांची स्थापना एकाच वर्षात झाली आणि ते वर्ष म्हणजे १९२५. साहजिकच, गेल्या वर्षी या दोन्ही संघटनांनी त्यांची शताब्दी साजरी केली. परंतु, या दोन संघटनांपैकी एकीच्या बाबतीत एक बाब मोठी वैशिष्ट्यपूर्ण ठरते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना, कागदोपत्री, अधिकृतपणे त्या पक्षाच्या कानपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्यावहिल्या अधिवेशनात तारीख २६ डिसेंबर १९२५ या दिवशी झालेली असली अथवा करण्यात आलेली असली तरी, तत्कालीन हिंदुस्थानातील कम्युनिस्ट पक्षाची स्थापना मात्र त्या आधी पाच वर्षे, म्हणजे, १९२० सालातील ऑक्टोबर महिन्यातच झालेली होती आणि त्याच्या स्थापनेचे स्थळ होते ताश्कंत!

भारतातील कम्युनिस्ट चळवळीचे पितामह गणल्या जाणाऱ्या श्रीपाद अमृत डांगे यांच्या चरित्रात या संदर्भातील विविध घडामोडींचा साद्यंत वृत्तान्त बघायला सापडतो. डांगे यांचे हे चरित्र लिहिले आहे ते त्यांच्या कन्या रोझा देशपांडे व त्यांचे पती बानी देशपांडे यांनी. किंबहुना, एकंदरीनेच साम्यवादी अथवा समाजवादी विचारसरणी भारतीय विचारविश्वात त्या काळात ज्या प्रक्रियेमधून साकारत राहिली तिचा एक सुबद्ध आलेखच रोझा देशपांडे यांनी लिहिलेल्या डांगे यांच्या या चरित्रात चितारलेला आहे. भारतातील कामगार चळवळीची पायाभरणी नारायण मेघाजी लोखंडे यांच्या

प्रयत्नांद्वारे १९व्या शतकाच्या उत्तरार्धात मुंबईत घडून आली. त्यांनी १८९० साली स्थापन केलेली 'बॉम्बे मिलहँन्डस् असोसिएशन' ही या देशातील पहिलीवहिली कामगार संघटना गणली जाते. महात्मा फुले, कृष्णराव भालेकर आदींचाही सहभाग व सहयोग लोखंडे यांना त्या काळात लाभला. डांगे यांच्या चरित्रात नमूद केल्यानुसार, लोकमान्य टिळक, पुढे, म्हणजे २३ सप्टेंबर १९१८ रोजी चिरोल खटल्यासाठी लंडनला गेले. त्या वेळी ब्रिटनमधील राजकीय व्यवस्थेमध्ये सक्रिय असलेल्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या धर्तीवर इथेही तसाच एक राजकीय पक्ष स्थापन करण्याचे त्यांच्या मनात घोळत होते. परत आल्यानंतर, त्यांनी व लाला लजपतराय यांनी 'इंडियन ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक)' ही कामगार संघटना स्थापन केली. या 'आयटक'ची स्थापना एका विशेष अधिवेशनात मुंबई येथे १९२० सालातील ऑगस्ट महिन्यात २२ तारखेला करण्याचेदेखील त्या वेळी मुकर्रर झाले. परंतु, १९२० सालातील १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक निर्वतल्यामुळे साहजिकच ते अधिवेशन तहकूब करणे भाग पडले.

कामगार वर्गाला लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाचे आकर्षण होतेच. टिळकांनादेखील कष्टकरी आणि शेतकरी वर्गांच्या समस्यांबद्दल जाण व कळवळा होता. 'आयटक'ची स्थापना करून, डांगे यांच्या प्रतिपादनानुसार, लोकमान्यांनी कामगार वर्गाला स्वातंत्र्याच्या चळवळीशीदेखील जोडून घेतले. 'आयटक'ची स्थापना होते वेळी डांगे होते अवघे २१ वर्षांचे. त्या काळातील तरूण पिढी लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाने भारावलेली होती. डांगे हेदेखील त्याला अपवाद नव्हते. वयाच्या १६व्या वर्षीच त्यांनी 'गीतारहस्य' विकत घेऊन वाचले होते. टिळक यांचे स्वराज्यप्राप्तीची मागणी करणारे राजकारण स्वरूपत: साम्राज्यशाहीच्या विरोधाचे आहे, हे डांगे यांना उमगलेले होते. साम्राज्यशाही आणि भांडवलशाही यांचे आंतरिक नाते जैविक स्वरूपाचे आहे. त्यांमुळे, ब्रिटिशांच्या जोखडाखालून मुक्त होणाऱ्या देशात मूठभर जमीनदार, भांडवलदार व पुंजीपती यांचीदेखील मक्तेदारी नांदता कामा नये, ही धारणा डांगे यांच्या मनाशी त्या संपूर्ण काळात हळूहळू स्थिर होत होती. कामगारवर्गाला लोकमान्य टिळक यांच्या नेतृत्वाबाबत वाटणारा आदर आणि कामगारवर्गाला स्वातंत्र्याच्या चळवळीशी जोडून घेण्याबाबतचा लोकमान्य टिळक यांचा साक्षेप यांत तत्त्वदृष्टीच्या पातळीवर तोदेखील एक अप्रगट धागा होता.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील टिळक पर्वाचा अंत होऊन गांधी युग अवतरले आणि डांगे व त्यांचे मित्र महात्माजींच्या प्रभावाखाली सक्रिय बनले. गांधीजींनी

असहकाराची हाक दिल्यानंतर अन्य अगणितांप्रमाणेच डांगे यांचा महात्माजींच्या असहकाराच्या चळवळीला संपूर्ण पाठिंबा होताच. परंतु, एका बाबतीत मात्र महात्माजींच्या विचारांशी डांगे यांचे सूत जुळत नव्हते. असहकाराच्या चळवळीचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांनी शाळा–महाविद्यालयांवर बहिष्कार घालावा, असे आवाहन गांधीजी करत असत. असहकाराच्या चळवळीला समर्थन म्हणून शाळा–महाविद्यालयांवर बहिष्कार घालून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनी करायचे काय, हा प्रश्न डांगे यांना सतत सतावत होता. असहकाराच्या चळवळीत सहभागी होत शाळा–महाविद्यालयांवर बहिष्कार टाकलेल्या विद्यार्थ्यांनी सूतकताई, प्रार्थना, सविनय कायदेभंग यांसारख्या उपक्रमांत सामील व्हावे, असा गांधीजींचा सांगावा होता. परंतु, डांगे त्यांबद्दल असमाधानी होते. त्या ऐवजी विद्यार्थ्यांनी शेतकरी, कामगार यांसारख्या समाजघटकांच्या चळवळी, संघटना व लढे उभे करावेत असे त्यांचे म्हणणे होते. परंतु, अशा उपक्रमांना गांधीजींच्या विचारविश्वात त्या वेळी स्थान नव्हते. यावरून विठ्ठलभाई पटेल यांच्याशी डांगे यांचा खटकाही उडाला. टिळकांचे तत्त्वज्ञान पुढे रेटणारे कोणी दिसत नाही आणि गांधीजींचा मार्ग पसंत नाही, अशा वैचारिक कोंडीत तारुण्यातील डांगे त्या वेळी सापडले होते.

मग, ब्रिटिशांची साम्राज्यशाही उलथून टाकण्यास टिळक आणि गांधी यांच्यापेक्षा निराळा असा काही मार्ग गवसतो का या शोधात असलेल्या डांगे यांना पर्याय दिसला तो बोल्शेविक तत्त्वज्ञानाचा! ७ नोव्हेंबर १९१७ या दिवशी रशियात घडून आलेल्या बोल्शेविक क्रांतीने त्या वेळी अनेकांना आकृष्ट केलेले होते. रशियातील सोशल डेमोक्रेटिक लेबर पार्टीमध्ये त्या काळात दोन गट होते. व्लादिमिर लेनिन यांना मानणारा त्या दोन गटांपैकी अति डाव्या विचारसरणीचा गट ‘बोल्शेविक’ म्हणून ओळखला जात असे. तर, पक्षातील दुसऱ्या गटाला म्हणत असत ‘मेल्शेविक’. या गटांची ती नावे त्यांच्या संख्यात्मक बळाशी निगडित होती. ‘बोल्शेविक’ याचा अर्थ ‘बहुमतातील गट’; तर, ‘मेन्शेविक’ याचा अर्थ ‘अल्पमतातील गट’. रशियातील जुलुमी अशा झारशाहीचा अंत १९१७ सालातील बोल्शेविक क्रांतीने घडवून आणल्यामुळे साम्राज्यशाहीच्या विरोधात लढणाऱ्या देशोदेशींच्या विचारांना त्यांबद्दल आकर्षण वाटण्याबरोबरच प्रेरणादेखील मिळत असे. बोल्शेविक क्रांतीच्या माध्यमातून रशियामध्ये घडून आलेल्या समाजवादी विचाराच्या पायाभरणीची मोहिनी सर्वत्र दाटत होती. हिंदुस्थानासकट चीन, इंडोनेशिया, इजिप्त, तुर्कस्तान यां देशांतील मुक्तीलढ्यांना त्यांद्वारे बळ मिळाले. १९१८ साली पहिले महायुद्ध संपले आणि

जर्मनी, युगोस्लाव्हिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया आदी देशांत क्रांती घडून आली. लेनिन यांच्या नेतृत्वाखाली रशियात घडून आलेल्या बोल्शेविक क्रांतीचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रभाव त्या साऱ्या घटनांवर होता.

साहजिकच, लेनिन यांचा बोल्शेविझम, बोल्शेविक क्रांती आणि तिच्या मुळाशी वसणारे समाजवादाचे तत्त्वज्ञान अनेक देशांतील तरुणांना प्रभावित करत होते. टिळक आणि गांधी यांच्यापेक्षा एखाद्या निराळ्या तत्त्वज्ञानाच्या शोधात असलेल्या डांगे यांच्या नजरेसमोर मग उभा राहिला पर्याय बोल्शेविझमचा. साम्राज्यशाहीच्या विरोधातील लढ्यासाठी बोल्शेविकांची आपल्याला मदत होऊ शकेल, अशी आशा तरूण वयातील डांगे यांच्या मनात त्या टप्प्यावर पल्लवीत झाली. टिळक काळाच्या पडद्याआड गेल्यानंतर 'आयटक'चे मुंबईतील अधिवेशन लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले. त्या अधिवेशनादरम्यान लाला लजपतराय यांनी रशियातील समाजवादी बोल्शेविक क्रांतीचा निर्देश केला. तसेच, साम्राज्यशाही आणि भांडवलशाहीच्या तत्त्वदर्शनापेक्षा समाजवादी व बोल्शेविक सत्य हे तुलनेने


## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

अधिक मानवी व विश्वासार्ह असल्याचे प्रतिपादनदेखील त्यांनी केले. रोझा देशपांडे यांनी त्यांच्या ग्रंथात नमूद केल्यानुसार, 'आयटक'च्या या अधिवेशनास मोतीलाल नेहरू, महंमदअली जीना, वल्लभभाई पटेलांचे ज्येष्ठ बंधू विठ्ठलभाई पटेल तसेच ॲनी बेझंट प्रभृती उपस्थित होत्या.

ब्रिटिशांच्या साम्राज्यशाहीविरोधातील लढ्यास बोल्शेविझमचे तत्त्वज्ञान आपल्याला उपयुक्त ठरू शकेल, अशी अटकळ मनाशी पक्की झाल्यानंतर डांगे मग बोल्शेविझमबद्दल अधिक माहिती मिळवण्याच्या मागे लागले. मुळातच ते तत्त्वज्ञान नवीन आणि त्यांतही ब्रिटिशांच्या अमदानीत बोल्शेविझमच्या शिकवणुकीचा प्रचार-प्रसार करणाऱ्या ग्रंथांना मोकळीक मिळणे मुदलातच दुरापास्त, त्यांमुळे बोल्शेविकांसंदर्भातील वाचनसाहित्याची त्या काळातील मुंबईत वानवाच होती. संदर्भांची शोधाशोध करणाऱ्या डांगे यांच्या हाती बर्ट्रांड रसेल यांचे 'रोड टू फ्रीडम' हे पुस्तक लागले. त्यांत बोल्शेविझमवर एक प्रदीर्घ लेख होता. त्यांतून डांगे यांचा परिचय झाला तो कार्ल मार्क्स यांच्या विचारविश्वाशी. मार्क्स यांचा कृतिशील सिद्धान्त डांगे यांना स्वीकारार्ह वाटला. तिथूनच, मग, टिळक-गांधी-लेनिन-मार्क्स या चौघांच्या विचारप्रणालीबाबत डांगे यांच्या मनात चर्वितचर्वण व सखोल मंथन घुमायला लागले आणि 'गांधी व्हर्सेस लेनिन' हा डांगे यांचा प्रबंध ठरला. त्या मंथनाची परिणती. ते साल होते १९२१. म्हणजे, वयाच्या अवघ्या २१-२२व्या वर्षी डांगे यांनी त्यांचा तो प्रबंध सिद्ध केला आणि स्वखर्चाने 'लिबर्टी' नावाच्या छापखान्यात तो छापवून घेतला. तो महिना होता एप्रिल. परंतु, तेवढ्यावर डांगे समाधानी नव्हते. समाजवादाचा विचार सर्वत्र पोहोचविण्यासाठी स्वत:चे नियतकालिक काढण्याचे त्यांच्या मनाने घेतलेले होते.

तो मानस डांगे यांनी सिद्धीस नेला तो १९२२ साली. डांगे यांच्यापेक्षा तीन वर्षांनी मोठ्या असणाऱ्या त्यांच्या भगिनींचे निधन त्यापूर्वीच काही महिने झाले होते. दिवंगत बहिणीने डांगे यांच्यासाठी त्यांचे सोन्या-मोत्याचे दागिने व चांदीची भांडी ठेवलेली होती. तो सारा ऐवज आणि घरातील अन्य काही भांडीकुंडी विकून डांगे यांनी 'सोशॅलिस्ट' नावाचे इंग्रजी साप्ताहिक सुरू केले. ५ ऑगस्ट १९२२ रोजी त्या साप्ताहिकाचा प्रथम अंक प्रकाशित झाला. मार्क्सवादी विचारांचे ते या देशातील आद्य इंग्रजी साप्ताहिक होय. समाजवाद, समाजवादी कृतिकार्यक्रम, कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे तत्त्वज्ञान यांसारख्या विषयांवर 'सोशॅलिस्ट'मधून डांगे नित्याने लिहू लागले. समाजवादी भूमिका व तत्वज्ञान यांचा प्रचार-प्रसार त्या माध्यमातून

सुरू झाला. ब्रिटिश अंमलाखालील हिंदुस्थानातील कामगारवर्गाचे प्रश्नदेखील त्यांद्वारे समाजमनासमोर मांडले जाऊ लागले.

रशियातील बोल्शेविक क्रांतीच्या आकर्षणाद्वारे डांगे यांच्या मनात समाजवादी विचारांचे जे बीजारोपण झाले त्यांतून त्या विचारांच्या प्रचार-प्रसारासाठी डांगे सक्रिय बनले. परंतु, त्या आधीच हिंदुस्थानच्या कम्युनिस्ट पक्षाची रीतसर स्थापना घडून आलेली होती ती १९२० सालीच. आणि तीदेखील इथे नव्हे तर ताश्कंतमध्ये! रोझा देशपांडे यांनी लिहिलेल्या डांगे यांच्या चरित्रात कथन केलेला त्या साऱ्या घटनाक्रमामागील कार्यकारणभाव मोठाच रोचक आहे. आणि त्याचा संबंध दिसतो तो – त्यांच्या कथनानुसार – तुर्कस्तानातील तत्कालीन घडामोडींशी. इस्लाममधील सुन्नी पंथियांचे राजकीय तसेच आध्यात्मिक नेतृत्व जागतिक स्तरावर करणारी खिलाफत राजवट ओटोमन साम्राज्याच्या सुलतानांच्या नेतृत्वाखाली तुर्कस्तानात १५१७ सालापासून नांदत आलेली होती. १९१८ साली पहिले महायुद्ध संपले. ब्रिटन-फ्रान्स-रशिया या तिघांच्या संयुक्त बळाविरुद्ध पहिल्या महायुद्धादरम्यान खिलाफत राजवटीने जगभरातील सुन्नी मुस्लिमांना लढ्याचे आवाहन केले होते १९१४ साली. परंतु, १९१६ ते १९१८ अशी दोन वर्षे उद्भवलेल्या अरबस्तानातील उठावांनी, ओटोमन साम्राज्याची जगभरातील मुस्लिमांवर जी एकतंत्री पकड होती तिला हादरा दिलेला होता. परिणामी, ओटोमन साम्राज्याच्या तुर्की खलिफांचे आवाहन शबल बनून पहिल्या महायुद्धात खिलाफतीच्या पदरात पराभव आला आणि महायुद्धानंतर ओटोमन साम्राज्याचे जेत्यांनी विभाजन घडवून आणले. युद्धोत्तर काळात, तुर्कस्तानात खलिफांनी पुन्हा दडपशाही व पारंपरिक धार्मिक धोरणांची तामिली सुरू केल्यानंतर तिथे खिलाफतीविरोधात उठाव सुरू झाला. अतातुर्क केमाल पाशा यांच्या नेतृत्वाखालील त्या उठावाने अखेर १९२४ साली खिलाफतशाही पूर्ण संपुष्टात आणली.

परंतु, तो झाला पुढचा भाग. १९१७ साली रशियामध्ये घडून आलेल्या बोल्शेविक क्रांतीनंतर जगभरातील अनेक देशांमध्ये कम्युनिस्ट विचार मूळ धरू लागले. देशोदेशी त्या विचारावर आधारित पक्षसंघटनादेखील स्थापन झाल्या. १९१९ सालापासून खलिफाविरुद्ध सुरू झालेल्या चळवळीचे पडसाद जगभरातील अनेक देशांमध्ये उमटू लागले. तत्कालीन हिंदुस्थानदेखील त्याला अपवाद नव्हता. खिलाफतीच्या विरोधात होऊ लागलेल्या उठावांना विरोध करण्यासाठी हिंदुस्थानातील काही मुस्लिमधर्मीय, रोझा देशपांडे यांच्या विवेचनानुसार, ताश्कंत इथे गेलेले होते. १८६५ साली रशियाने

ताश्कंतवर कबजा प्रस्थापित केला होता. रशियाच्या ताब्यात तेव्हापासून असलेल्या तुर्कस्तानच्या भूभागाची ताश्कंत ही राजधानी होती. ताश्कंतमध्ये स्थापन झालेल्या कम्युनिस्ट पक्षाशी हिंदुस्थानातील स्थलांतरित इस्लामधर्मीयांचा संपर्क प्रस्थापित झाला. आणि, त्या स्थलांतरितांपैकी काहींनी १७ ऑक्टोबर १९२० या दिवशी हिंदुस्थानातील कम्युनिस्ट पक्षाची तिथे स्थापना केली! या पक्षाने मग, हिंदुस्थानात जे पक्ष अथवा संघटना कम्युनिस्ट विचारप्रणालीचा पाठपुरावा करत होते त्यांच्याशी तसेच डांगे यांच्याशी संपर्क प्रस्थापित करण्यास सुरुवात केली... हिंदुस्थानातील कम्युनिस्ट विचारधारेला राजकीय पक्षासारखे संस्थात्मक रंगरूप प्राप्त होण्यामागील घटनाप्रणाली, रोझा देशपांडे यांच्या कथनानुसार, ही अशी दिसते.

---

## विद्रोह

***(पान ४ वरून)***

त्या विस्मरणाचे तरी स्मरण घडावे याचसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा एक लेख 'उजळणी'मध्ये आवर्जून पुनर्प्रकाशित केलेला आहे. पार १८८१ सालापासून दर दहा वर्षांनी आजवर होत आलेली जनगणना हे भारतीय व्यवस्थेचे एक वैशिष्ट्य राहिलेले आहे. २०२१ साल मात्र त्या परिपाठाला अपवाद ठरले ते 'कोविड-१९'ने माजविलेल्या हलकल्लोळापायी. जनगणनेची पार्श्वभूमी, तिचे महत्व आणि आता २०२७ साली होऊ घातलेल्या जनगणनेचे वैशिष्ट्य यांचा उहापोह करणारा ज्येष्ठ लोकसंख्याशास्त्रज्ञ आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या नियामक मंडळाच्या सन्मान्य सदस्य डॉ. अंजली राडकर यांचा 'पुरवणी'मध्ये सादर केलेला लेख उद्बोधक आहे. यंदाचा उन्हाळा आपल्या देशात अ-साधारण म्हणूनच गणला जातो आहे. जवळपास १५० वर्षांनंतर 'सुपर एल-निनो'चा सामना जागतिक समुदायाला करावा लागेल, असे भाकितवजा अंदाज वर्तवले जात आहेत. पृथ्वीच्या पृष्ठभागाचे तापमान वाढत राहिल्याने निर्माण होत असलेल्या पर्यावरणीय समस्यांचा सामना कसा करायचा, हा यक्षप्रश्न आज सगळ्यांच्याच पुढ्यात आहे. हे संकट बहुश: आपणच निर्माण करत आहोत, केलेले आहेदेखील. आता, त्यांवर अत्याधुनिक तंत्रशास्त्राच्या साहाय्याने काही उतारा शोधता येतो किंवा कसे यांच्या दिशा सूचित करणारा या अंकातील लेख एकाच वेळी दिलासादायक आणि आरसा दाखविणारा असाच आहे!

## तंत्रज्ञान

# युद्धप्रवणता आणि सायबर सुरक्षेचे आव्हान

मध्य पूर्वेमध्ये सुरू असलेल्या अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्या संघर्षाने आधुनिक युद्धाला एक नवे स्वरूप आणि परिमाण मिळवून दिले आहे. आता हे युद्ध केवळ रणांगणापुरते मर्यादित राहिलेले नाही हे एव्हाना सर्वांच्या लक्षात येऊ लागले आहे. अलीकडच्या काळामध्ये, अन्य देशांवर चढाई करून शत्रूला नामोहरम करण्याचा सायबर हल्ले हा नवीनच पर्याय अवलंबला जातो आहे. परिणामी, सायबर सुरक्षेसाठी दक्ष राहण्याची तजवीज करणाऱ्यांच्या पुढ्यात अपूर्व अशी आव्हाने निर्माण होत आहेत. शत्रूराष्ट्रांवर हल्ले करण्यासाठी आजमितीस क्षेपणास्त्रे आणि 'ड्रोन' यांच्या जोडीनेच सायबर हल्ल्यांचे प्रभावी शस्त्रदेखील उपसले जाते आहे. असे सायबर हल्ले चढविणारे 'हॅकिंग' गट म्हणजे आधुनिक लष्करातील एक जणू तुकडीच या स्वरूपात आकारास येत असून तिचे महत्त्व वाढत चालले आहे.

रणांगणावरील पारंपरिक युद्ध सुरू झाल्यानंतरसुद्धा सायबर हल्ले किती प्रभावी ठरू शकतात याची काही उदाहरणे अमेरिका-इराण संघर्षामध्येसुद्धा दिसून आली. वैद्यकीय उपकरणे बनवणाऱ्या अमेरिकेतील Stryker Corporation या कंपनीवर इराणसमर्थक 'हॅकिंग' गटाने सायबर हल्ला केला आणि त्या कंपनीचा संपूर्ण माहितीसाठा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. अशाच प्रकारचे सायबर हल्ले ऊर्जा कंपन्या, वित्तीय सेवा संस्था आणि वाहतूक नियमन करणाऱ्या यंत्रणा यांच्यावरही झाले. त्यामुळे, जेव्हा भू - राजकीय तणाव वाढून संघर्ष विकोपाला जातो तेव्हा सायबर सुरक्षेच्या संदर्भातही आता अधिक सतर्कता बाळगावी लागते. World Economic Forum या व्यासपीठाने अगदी अलीकडेच प्रकाशित केलेल्या Global Cybersecurity Outlook या अहवालामध्ये, त्यांमुळे, या विषयावर आवर्जून भाष्य करण्यात आले आहे. जगाच्या पाठीवर कोठे ना कोठे सतत नांदणारी राजकीय अस्थिरता आणि सशस्त्र संघर्ष यामुळे सायबर हल्ल्यांचे स्वरूपही वेगाने बदलते

आहे. त्यातून अधिक गुंतागुंतीची आणि अनिश्चिततेची परिस्थिती निर्माण होते आहे, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे, जगभरातील विविध देशांनी आखलेल्या सायबर सुरक्षा धोरणांमध्येही लक्षणीय बदल होत आहेत. जागतिक तणावांचा एकूणच जगभरातील संगणकीय प्रणालींवर जो वाढता परिणाम होतो आहे आणि त्यांमुळे सर्वत्र सरासरीने जी जोखीम वाढत चाललेली आहे ती डोळ्यांआड करता येण्याजोगी नाही. मध्यपूर्वेतील अगदी अलीकडील संघर्षामुळे या धोक्याची तीव्रता अधिकच प्रकर्षाने अधोरेखित झाली. या वास्तवाबाबत जगभरातील जाणकार आता उघडपणे चिंता व्यक्त करू लागले आहेत.

अगदी अलीकडच्या काळात इराणवर झालेला Stuxnet हा, संसर्गजन्य संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात आलेला हल्ला म्हणजे सायबर सुरक्षेपुढील आव्हानाचे एक महत्त्वाचे परिमाण ठरावे. जगात आजवर घडवून आणल्या गेलेल्या सायबर हल्ल्यांतील तो सर्वांत प्रगत सायबर हल्ला मानला जातो. हा हल्ला केला गेला तो औद्योगिक यंत्रणांवर. औद्योगिक उपकरणांमध्ये घुसून ती निकामी करणे हा त्या मागील मुख्य उद्देश होता. इराणमधील Natanz Uranium Enrichment Facility या केंद्रावर हा सायबर हल्ला करण्यात आलेला होता. या हल्ल्यामुळे इराणच्या अणुऊर्जानिर्मिती कार्यक्रमाला मोठी हानी पोहोचली, असा दावा त्या नंतर करण्यात आला. त्याची थेट जबाबदारी कुणी स्वीकारली नसली तरीही हा आजवरचा एक अतिशय प्रभावी हल्ला होता याची नोंद मात्र वैश्विक पातळीवर घेतली गेली. सायबर हल्ले हे केवळ माहितीची चोरी करण्यापुरते मर्यादित नाहीत तर, मालमत्तेचे मोठे नुकसान करण्याची क्षमतादेखील त्यांच्या ठायी वसते, हे वास्तव या हल्ल्याद्वारे प्रस्थापित झाले. अत्यंत प्रगत अशा संगणकीय सांकेतिक शब्दसंहतीचा (कोड) वापर करून हा हल्ला घडवून आणला गेल्याचे अभ्यासकांच्या आता लक्षात आले आहे. त्या पूर्वी, २०१७ साली Not Petya या नावाचा एक सायबर हल्ला करण्यात आलेला होता. त्याचा जन्म झाला युक्रेनमध्ये. त्या नंतर तो जगभरातील कंपन्यांमध्ये पसरत गेला. अनेक मोठ्या कंपन्यांचे कामकाज या सायबर हल्ल्याने पूर्णपणे ठप्प करून टाकलेले होते. त्यामध्ये Maersk या जगातील सर्वांत मोठ्या जहाज कंपनीचाही समावेश होता. Merck & Co या कंपनीचे औषध उत्पादनाचे कामदेखील अशाच हल्ल्यापायी बंद पडले. अशा स्वरूपाच्या सायबर हल्ल्यांचे गांभीर्य लक्षात आणून देणारी अशी आणखी उदाहरणेही सांगता येतील.

या सगळ्या अशा पार्श्वभूमीवर, जगभरात होणारे संभाव्य सायबर हल्ले रोखण्यासाठी व्यापक स्वरूपाची सायबर सुरक्षाप्रणाली प्रस्थापित करण्यासाठी एकत्रित

येऊन पावले उचलण्याची गरज आता अनेक व्यासपीठांवरून अधोरेखित होऊ लागली आहे. कॅनडामधील एक वरिष्ठ सायबर सुरक्षा अधिकारी Sami Khoury यांच्या मते, Hybrid Warfare हे चालू युगातील युद्धाचे वास्तवातील स्वरूप आहे. पारंपरिक पद्धतीने लढले जाणारे युद्ध आणि सायबर हल्ले, माहितीचा गैरवापर, आर्थिक दबाव यांचा एकत्रित वापर करून अपारंपरिक पद्धतीने लढले जाणारे युद्ध यांचा समांतर पद्धतीने वापर करून शत्रूला जेरीस आणून नामोहरम करण्याची युद्धप्रणाली म्हणजे Hybrid Warfare होय. अलीकडच्या काळात अशा प्रकारच्या युद्धांचे प्रमाण वाढत चालले आहे. यात प्रामुख्याने संगणकप्रणाली, बँकिंग व वीजव्यवस्था यांना लक्ष्य बनवून त्यांच्यावर सायबर हल्ले केले जातात. खोटी माहिती प्रसारित करून लोकांमध्ये गोंधळ निर्माण केला जातो आणि त्याद्वारे माहिती विश्वाच्या रणांगणावरील युद्ध लढले जाते. नानाविध निर्बंधांद्वारे आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम घडवून आणत देशाची अर्थव्यवस्था कमजोर करण्याचा प्रयत्न केला जातो. दहशतवादी कारवायांच्या माध्यमातून देशांतर्गत सुरक्षेला आव्हान निर्माण केले जाते. निवडणुकांमध्ये हस्तक्षेप निर्माण करून राजकीय अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. रशिया आणि युक्रेन यांच्यादरम्यानच्या संघर्षामध्ये सायबर हल्ले मोठ्या प्रमाणावर झाले आणि आता अमेरिका-इराण यांच्या दरम्यानच्या युद्धातसुद्धा Hybrid Warfareचा वापर होताना दिसतो आहे. Hybrid Warfareमध्ये युद्ध प्रगट दिसत नाही पण देशाच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करण्याची अपार क्षमता त्याच्यामध्ये असते.

युद्धांदरम्यान सायबर हल्ल्यांच्या शस्त्राचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्याने संघर्षाच्या काळात मोठ्या उद्योगसंस्था, पायाभूत सुविधा यांचे संरक्षण करणे हे दिवसेंदिवस आव्हानात्मक बनत चालले आहे. युद्धांदरम्यान या पुढे सायबर हल्ले होतच राहणार हे लक्षात घेऊन त्यांच्या आघातांचे परिणाम सीमित राखणे आणि जे काही हल्ले होतील त्यांपायी झालेल्या नुकसानीची भरपाई करून शक्य तितक्या लवकर स्थिती पूर्ववत रुळांवर आणणे ही आगामी काळातील गरज बनलेली आहे. तेव्हा, सायबर सुरक्षेच्या दृष्टीने हल्ले रोखण्याची यंत्रणा सक्षम बनवण्याबरोबरच ही दुसरी भूमिकादेखील अंगी बाणवणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे देशांतर्गत पातळीवर सायबर सुरक्षा प्राधिकरणांना अधिक सक्षम आणि अद्ययावत करणे येत्या काळात आवश्यक ठरणार आहे. महत्वाच्या यंत्रणांचे संरक्षण करणे, धोक्यांची पूर्वसूचना व इशारे मिळण्याच्या व्यवस्था बुलंद बनविणे आणि या प्रकारच्या हल्ल्यांविषयी

जागरुकता निर्माण करणे या बाबी आवश्यक बनत चालल्या आहेत. आंतरराष्ट्रीय विश्वातील वाढलेले परस्परसंबंध आणि साहचर्य लक्षात घेता, या संदर्भातील आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सामूहिक कृतींवरही भर द्यावा लागणार आहे. कोणतीही परिस्थिती कधीही निर्माण होऊ शकते याची संभाव्यता ध्यानात घेऊन भविष्यातील सर्व प्रकारच्या आव्हानांसाठी आपण सज्ज असले पाहिजे, याची जाणीव वैश्विक समूहाला या पुढे कायम जपावी लागणार आहे. अलीकडच्या काळातील घटनांमधून हा धडा सर्वांना शिकायलाच हवा, अशी भूमिका Sami Khoury यांनी मांडली आहे.

आफ्रिकेतील Rwanda या देशाने विविध क्षेत्रांत चांगली प्रगती साध्य करण्यासाठी 'स्मार्ट आफ्रिका' नावाचा एक स्वतंत्र विभाग सुरू केलेला आहे. त्या विभागात पायाभूत सुविधा, कौशल्ये आणि सक्षमीकरण या विषयांसंदर्भात काम करणारे संचालक Thelma Quaye या सायबर हल्ल्यांच्या रंगरूपामध्ये घडून येत असलेल्या बदलांकडे अभ्यासूपणे बघत आहेत. त्यांच्या मते, सायबर हल्ले पूर्वीही होत होते परंतु त्यांचे प्रमाण मर्यादित होते आणि त्यांचे उद्दिष्टही वेगळे असायचे. प्रामुख्याने आपला काही संकुचित स्वार्थ साधण्यासाठी केल्या जाणाऱ्या सायबर हल्ल्यांचे प्रमाण पूर्वी तुलनेने अधिक होते. परंतु अलीकडच्या काळात त्यात मोठा बदल झाला आहे. नियोजित आणि भूराजकीय ईर्षांच्या प्रेरणांनी प्रेरित असलेल्या सायबर हल्ल्यांचे प्रमाण आताशा वाढले आहे. हा एक अतिशय महत्त्वाचा असा बदल आहे. Hack and Leak या प्रकारातील कारवायांचे प्रमाण यांत अधिक वाढलेले आहे. त्यामुळे आगामी काळात Network of Cybersecurity Authorities सारख्या संस्थांची निर्मिती आवश्यक ठरणार असून त्या माध्यमातून विविध देशांमध्ये समन्वय, संबंधित माहितीची सुलभ व वेगवान देवाणघेवाण आणि एकसंध प्रतिसाद देण्यासाठी त्वरित उपाययोजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने अशा संस्थात्मक यंत्रणांचा निश्चितपणे उपयोग होऊ शकतो. सायबर सुरक्षेकडे या पुढील काळात आपल्या देशाच्या संदर्भात किंवा तुकड्या-तुकड्यांत पृथकपणे पाहून चालणार नाही. तर, या संदर्भात एकात्मिक दृष्टीचा अंगीकार समन्वयपूर्ण रीतीने केला जाण्याची गरज आता या नव्या आव्हानांमुळे अधोरेखित होऊ लागलेली आहे. त्यामुळे, समरांगणांवरील आव्हानांचा सामना करण्यासाठी, जगभरातील सर्वच देशांना, पारंपरिक स्वरूपाची सामरिक सुरक्षायंत्रणा सक्षम बनवत असतानाच सायबर सुरक्षेच्या दृष्टीनेही उचित अशी पावले उचलणे आणि जागतिक स्तरावर एकत्र येऊन समन्वित अशी सुरक्षाप्रणाली उभी करणे अनिवार्य बनावे.

# विज्ञान-तंत्रज्ञान

## प्रयोग, सूर्याचे किरण सूर्यालाच परत करण्याचा..!

हवामान बदल आणि परिणामी घडून येणारी वैश्विक तापमानवाढ या दोन समस्यांनी अवघ्या जगाला आज वेढलेले आहे. आजच्या काळातील सर्वांत गंभीर प्रश्न म्हणून यांच्याकडे पाहिले जाते आहे. वाढते तापमान, त्यांपायी वितळणाऱ्या हिमनद्या आणि एकंदरीनेच अनियमित बनत असलेले हवामानाचे चक्र यामुळे सगळे जग चिंतेत आहे. यातून काय तोडगा काढता येईल यांबाबत विचारमंथनासह जगभरात विविध प्रयत्न सुरू आहेत. असाच एक प्रयोग सध्या सुरू आहे आणि तो म्हणजे पृथ्वीपर्यंत पोहोचणारा सूर्यप्रकाश कमी करणारे तंत्रज्ञान शोधून काढण्यासंदर्भातील. याला शास्त्रीय परिभाषेत Solar Geoengineering असे संबोधतात. या अभिनव प्रयोगासाठी जगातील सर्वांत श्रीमंत गणली जाणारी हस्ती आणि मायक्रोसॉफ्ट कंपनीचे सर्वेसर्वा असणारे बिल गेट्स हेदेखील स्वत:हून पुढाकार घेत आहेत. पृथ्वीच्या पृष्ठभागावर येऊन पोहोचणाऱ्या सूर्यप्रकाशाचे प्रमाण कमी कसे करता येईल या दिशेने सदर संशोधन केले जात असून त्यांमागे बिल गेट्स यांनी आर्थिक मदतीचे पाठबळ उभे केले आहे.

पृथ्वीवर येणारे सूर्यकिरण परावर्तित करून पुन्हा अवकाशात पाठवता आले तर पृथ्वीवर सातत्याने वाढणारे तापमान कमी होऊ शकेल, असा संशोधकांचा कयास असून त्या दिशेने संशोधन सुरू आहे. Harvard University मधील शास्त्रज्ञांनी हा प्रयोग सुरू केला असून या प्रयोगाला Stratospheric Controlled Perturbation Experiment (SCoPEx) असे नाव देण्यात आलेले आहे. विषारी नसलेले कॅल्शिअम कार्बोनेट (CaCO3) वातावरणात फवारून सूर्यकिरण परावर्तीत केले जाऊ शकतात. या प्रयोगाला यश मिळाले तर जागतिक तापमानवाढ रोखण्याच्या प्रयत्नांना चांगला हातभार लागू शकतो असा शास्त्रज्ञांना विश्वास आहे. या तंत्रज्ञानाच्या परिणामकारकतेसंदर्भात व्यापक संशोधन हाती घेण्याबाबतची चाचपणी

चालू असतानाच त्याबाबत अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याने काही विवाद उत्पन्न झाले. या प्रयोगासंदर्भात पर्यावरणतज्ज्ञांनीदेखील काही आक्षेप घेतलेले आहेत. SCoPEx या प्रकल्पाच्या सुरुवातीच्या टप्प्यामध्ये Solar Radiation Management या प्रणालीवर प्रामुख्याने भर देण्यात आलेला आहे. सूर्यप्रकाश परावर्तित करू शकेल असे कॅल्शिअम कार्बोनेट अंतराळात फवारून पृथ्वीच्या पृष्ठभागावर येणाऱ्या सूर्यकिरणांची प्रखरता कमी करता येऊ शकते अथवा कसे, या संदर्भातील प्रयोग आहे. Breakthrough Energy Ventures या कंपनीच्या माध्यमातून हा संपूर्ण प्रकल्प राबवण्यात येतो आहे. त्यासाठी Sun-dimming हे तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दिशेने पावले उचलली जात आहेत.

परंतु तरीही हा सगळाच विषय वादाच्या भोवऱ्यात सापडलेला आहे, कारण Solar Geoengineering हा प्रयोग अत्यंत धोकादायक असल्याचे अनेक शास्त्रज्ञांचे मत आहे. या विषयी चिंता व्यक्त करणारे एक पत्र जगभरातील ६० प्रमुख शास्त्रज्ञांनी प्रसिद्ध केले आहे. जर्मन पर्यावरण संरक्षण समितीचे अध्यक्ष Dirk Messner, केंब्रिज विद्यापीठातील हवामानशास्त्रज्ञ Mike Hulme, Stockholm Environment या संस्थेच्या संचालिका Asa Persson आदी प्रमुख शास्त्रज्ञांच्या त्यावर स्वाक्षऱ्या आहेत. त्यांच्या मते हा प्रयोग भविष्याच्या दृष्टीने नक्कीच धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे असे प्रयोग राबवण्यापूर्वी त्यांच्या दूरगामी धोक्यांचा व परिणामांचा विचार करणे गरजेचे आहे. फिलिपिन्समध्ये १९९१ साली Mount Pinatubo येथे झालेल्या ज्वालामुखीच्या उद्रेकादरम्यान निर्माण झालेल्या राखेचा थर पर्यावरणात स्थिरावल्यामुळे जागतिक तापमान दोन वर्षांसाठी ०.५ अंश सेल्सिअसने कमी झालेले होते. या प्रक्रियेला वैज्ञानिक परिभाषेत Aerosol अशी संज्ञा आहे. यात, अतिसूक्ष्म कण अथवा अगदी लहान आकाराचे द्रवबिंदू वातावरणात फवारून पृथ्वीच्या पृष्ठभागासभोवती त्याचे एक आवरण तयार होते अथवा केले जाते. हे आवरण निसर्गसिद्ध आणि मानवनिर्मित अशा दोन्ही प्रकारांतील असू शकते. धूळ, धूर, ज्वालामुखीमधून बाहेर पडणारी राख ही अशा नैसर्गिक Aerosolची काही उदाहरणे होत. तर, वाहनांतून तसेच उद्योगांमधून बाहेर पडणारा धूर ही होत मानवनिर्मित Aerosolची काही मुख्य उदाहरणे. पृथ्वीच्या पृष्ठभागावर पडणारा सूर्यप्रकाश असे Aerosol पुन्हा परावर्तित करतात. परिणामी, पृथ्वीच्या पृष्ठभागाची तापमानवाढ रोखणे शक्य बनते.

परंतु, अशा प्रकारे Aerosolचा वापर करून तापमान कमी करण्याचा प्रयोग योग्य नाही अशी भूमिका या शास्त्रज्ञांनी मांडली आहे. कार्बन उत्सर्जनामुळे होणारी पृथ्वीच्या पृष्ठभागाची तापमानवाढ चिरंतन रोखण्यासाठी Aerosol सारखे कृत्रिम कवच दीर्घकाळासाठी तयार करून ठेवावे लागेल. परंतु असे केल्यास, नैसर्गिक हवामानप्रणालीमध्ये (धोकादायक ठरू शकेल असा मानवी) हस्तक्षेप टाळण्यासंदर्भात United Nations Framework Convention on Climate Change (UNFCCC) या संस्थेने जी नियमावली प्रसिद्ध केलेली आहे तिचे ते उल्लंघन ठरेल इतकेच केवळ नाही तर, तसे करणे म्हणजे त्या उद्दिष्टाच्या विरोधातील ती कृती ठरेल, अशी भूमिका या शास्त्रज्ञांनी मांडली आहे. पुढील काळात काही कारणाने हे Aerosol आवरण दूर केले गेले तर पृथ्वीचा पृष्ठभाग थंड राखण्यासंदर्भात त्या कवचाचे लाभणारे संरक्षण अचानक कमी होईल आणि त्याचा एक संभाव्य परिणाम म्हणून वातावरणात साचलेले हरितवायू पृथ्वीच्या पृष्ठभागावर एकत्रितपणे एकाच वेळी अनिष्ट परिणाम घडवू लागतील. उद्या तसे खरोखरच झाल्यास जागतिक तापमानात अचानक घडून आलेली अथवा येणारी संभाव्य अशी खूप मोठी वाढ भविष्याच्या दृष्टीने अधिक धोकादायक ठरू शकते, असे काही वैज्ञानिकांचे प्रतिपादन आहे.

अमेरिकेतील Yale Universityने २०१८ साली केलेला एक अभ्यास नंतर Nature Ecology & Evolution या नियतकालिकामध्ये प्रकाशित झाला. या अभ्यासानुसार, Solar Geoengineering च्या दूरगामी परिणामांचा विचार अधिक सखोलपणे व गांभीर्याने केला जाणे अधिक महत्त्वाचे ठरते. असे असतानाही, अमेरिकेने २०१९ साली Solar Geoengineering मधील संशोधनासाठी National Oceanic and Atmospheric Administration (NOAA) या संस्थेला चार दशलक्ष अमेरिकी डॉलर्स इतके अर्थसाह्य मंजूर केले. याच प्रकल्पाला बिल गेट्स यांनी आर्थिक मदतीचा टेकू दिलेला होता. Yale Universityमधील शास्त्रज्ञांनी खुल्या पत्राद्वारे जी आशंका आणि भीती व्यक्त केली आहे तिचे गांभीर्य या उपक्रमाचे प्रमुख संशोधक आणि Harvard University मधील वरिष्ठ प्राध्यापक David Keith यांनी अधोरेखित केले. या संशोधनातील अनिश्चितता, धोके या बाबत त्यांनाही चिंता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र Solar Geoengineering वर कायमस्वरूपी बंदी घालावी हे मात्र योग्य पाऊल ठरणार नाही अशीही भूमिका त्यांनी मांडली.

या संदर्भात David Keith यांनी Intergovernmental Panel on Climate Change आणि National Academy of Science यांच्या अहवालांचा संदर्भ

दिला. Solar Geoengineering या तंत्राच्या उपयोजनाद्वारे हवामानबदलाचा धोका खूप कमी होऊ शकतो असा दाखला त्यांनी त्या अहवालांवरून दिला आहे. त्यांमुळे, या तंत्रज्ञानाच्या वापरावर कायमस्वरूपी बंदी आणणे योग्य नाही अशी भूमिका ते आग्रहाने मांडतात. 'कोविड-१९'च्या निराकरणासाठी लस तयार करीत असताना त्यासाठी वापरल्या गेलेल्या mRNA या तंत्रज्ञानाच्या वापराबाबतसुद्धा त्या वेळी नाना प्रकारच्या शंका उपस्थित केल्या जात होत्या; अनेक प्रकारची भीती व्यक्त केली जात होती, याचा दाखला या संदर्भात देत, अशा साशंकतांपायी तंत्रज्ञानाच्या वापरावर निर्बंध घालणे योग्य नाही अशी भूमिका David Keith यांनी मांडली. असे असले तरी या प्रयोगांना विरोध वाढतच राहिला. संबंधित चाचण्यांच्या विरोधात अनेक ठिकाणी लोकांनी आंदोलनेसुद्धा केली. त्यामुळे Solar Geoengineeringची प्रत्यक्ष चाचणी मात्र घेता आली नाही. Swedish Space Corporationच्या सहकार्याने आणि Harvard Universityच्या पुढाकाराने आयोजित केलेली या तंत्रशास्त्राची पहिली चाचणी अखेरीस रद्द करावी लागली. नेदरलँडमधील Utrecht Universityमध्ये पर्यावरण आणि शाश्वतता या विषयाचे प्राध्यापक असलेले Frank Biermann यांच्यासारखे अभ्यासक या प्रयोगाच्या अगदी ठाम विरोधात आहेत. त्यांच्या मते, Solar Geoengineeringचे प्रयोग करणे, त्याची चाचणी घेणे, त्याचे 'मॉडेल' प्रयोगशाळेत तयार करणे ही अगदी वेगळी बाब आहे. परंतु, जेव्हा अवकाशात त्याचे प्रत्यक्ष प्रयोग करून पाहण्याचे ठरते तेव्हा तशा प्रयोगांचे व्यवहारातील परिणाम प्रयोग झाल्यानंतरच स्पष्ट होणार असतात. त्यामुळेच ज्याचे (संभाव्य असे अनिष्ट अथवा दुष्परिणाम) जगाला भोगावे लागू शकतात अशा धोकादायक प्रयोगांना आमचा विरोध कायमच राहील, अशी त्यांची या संदर्भातील ठाम भूमिका दिसते.

Solar Geoengineeringमुळे पृथ्वीच्या पृष्ठभागावर थेट येणाऱ्या सूर्यकिरणांचे प्रमाण कमी होईल हे जरी एकवेळ खरे मानले तरी त्याचेही परिणाम प्रत्यक्षात नेमके कसे होतील हे सांगता येणार नाही. शास्त्रज्ञांकडून अशी शक्यता वर्तवली जाते आहे की, असे प्रयोग खरोखरीच राबवल्यास पृथ्वीचे तापमान अचानक थंड होईलही, पण ते समान प्रमाणात होणार नाही. संगणकीय प्रारूपांद्वारे याचा जो अभ्यास करण्यात आला आहे त्यानुसार, ॲमेझॉनच्या जंगलांमधील वर्षाप्रवण असणारे क्षेत्र कदाचित कोरडे आणि उष्ण होऊ शकते. असे खरोखरच झाले तर त्याचा एक परिणाम म्हणजे मोठ्या जंगलांमध्ये आगी लागण्याचे प्रमाण वाढण्याची व त्यापायी

मोठ्या प्रमाणावर वनसंपदेचा नाश होण्याची शक्यता नाकारता येण्याजोगी नाही. ते नुकसान कशानेही भरून येणारे नसेल. असे झाल्यास त्यामुळे होणारे कार्बन उत्सर्जन हे अधिक प्रमाणात असेल आणि इतक्या मोठ्या प्रमाणात कार्बन वातावरणात पुन्हा सोडला गेला तर ते पृथ्वीसाठी अधिक धोकादायक ठरू शकते. अशा अपघातांपायी जैवविविधता तर वेगाने कमी होईलच पण त्यांमुळे तापमानवाढदेखील खूप मोठ्या प्रमाणात संभवते.

अशा प्रकारचे संरक्षक कवच तयार केल्यामुळे होणाऱ्या विविध अशा संभाव्य परिणामांची कल्पना अद्याप कुणालाच नाही. काही अभ्यासकांच्या मते यामुळे ‘ओझोन’चा सध्या असणारा संरक्षक थर कमी होऊ शकतो किंवा वाढूदेखील शकतो. कार्बन उत्सर्जनात घट होईल असे अनुमान धरून हे प्रयोग करण्याचा मानस असला तरी तसे न झाल्यास महासागरांचे आम्लीकरण (Ocean Acidification) घडून येण्यासारखे नवीनच गंभीर आव्हान आपल्या पुढ्यात उभे ठाकलेले दिसू शकेल. त्यामुळेच संपूर्ण पृथ्वीच्या संरक्षणासाठी काही प्रयोग प्रस्तावित केले तरी त्यातून नवे धोके किंवा आव्हाने तर निर्माण होणार नाहीत ना, याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे, असा सूर वैज्ञानिकांच्या वर्तुळात सध्या गुंजताना दिसतो.

बिल गेट्स यांनी हवामानबदलाच्या संदर्भात म्हटले आहे की, हवामान बदल हा एकूणच जगाच्या दृष्टीने अतिशय गंभीर असा विषय आहे. जगाला शून्य कार्बन उत्सर्जनापर्यंत घेऊन जाण्यासाठी मदत करणाऱ्या नव्या कल्पनांच्या पाठीशी आपण सातत्याने उभे राहिले पाहिजे. परंतु हे साध्य करीत असताना त्यातील धोकेही लक्षात घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर आरोग्य आणि विकासासाठी तरतूद केलेल्या निधीमध्ये कपात करता येणार नाही. हवामानबदलाच्या परिणामांपुढे टिकून राहण्यासाठी व त्यावर मात करण्यासाठी विविध पावले उचलणे अपरिहार्य आहे. आपल्या हवामान धोरणांच्या केंद्रस्थानी मानवी कल्याण असणे गरजेचे आहे. कार्बन उत्सर्जन शून्यावर आणणे, गरीब देशांमधील शेती व आरोग्यात सुधारणा करणे आणि हवामानबदलांशी संबंधित परिणामांचा सामना करण्यासाठी सर्वांचेच हात बळकट करणे गरजेचे आहे.

# पुरवणी

## बहुप्रतिक्षित भारतीय जनगणना

■ डॉ. अंजली राडकर

येणाऱ्या जनगणनेचे पडघम वाजायला सुरुवात झाली आहे. २०२१ साली होणारी जनगणना एक नाही दोन नाही तर तब्बल सहा वर्षे लांबली. सर्वजण उत्सुकतेने जिची वाट पाहत होते ती जनगणना २०२७ साली होणार असल्याचे घोषित झाले. त्या अनुषंगाने हे सर्व नागरिकांपर्यंत पोचविण्यासाठी सरकारचे जोरदार प्रयत्नही सुरू झाले. वास्तविक जनगणना म्हणजे सर्व माणसांची मोजदाद जरी २०२७ मध्ये होणार असली तरी त्याची पूर्वतयारी म्हणून, सर्व प्रकारच्या प्रसारमाध्यमांतून याविषयी माहिती प्रसृत व्हायला तर केव्हाच सुरुवात झाली आहे. त्याच्याच बरोबरीने आता एप्रिल महिन्याच्या एक तारखेपासून घरांवर नंबर घालायच्या कामालाही सुरुवात झाली आहे.

गेली १५ वर्षे समाजात सतत बदल होत आहेत आणि त्या बदलांचा वेगही जोरदार आहे. अशा बदलांमुळे लोकसंख्येत किंवा लोकसंख्यावाढीच्या प्रक्रियेत काय नेमका फरक पडला आणि त्याचा परिणाम आकड्यात कसा परावर्तित झाला, त्यामुळे देशाच्या सामाजिक आणि आर्थिक पटलावर नेमके काय घडले, आपल्या राज्यात, आपल्या गावात काय आणि कसे बदलले, हे जाणून घेण्याची उत्सुकता सर्वत्र आहे. समाज बदलतो आहे त्यादृष्टीने नियोजन आणि नियोजनाच्या पध्दतीतही बदल होणे स्वाभाविक आहे. अशा बदलत जाणाऱ्या समाजासाठी योग्य पद्धतीचे नियोजन हे खरे तर एक आव्हान असते आणि ते आव्हान समर्थपणे पेलण्यासाठी अचूक माहिती उपलब्ध असणे फार गरजेचे असते. याखेरीज ही माहिती नियमितपणे मिळणेही महत्वपूर्ण असल्याने जनगणनेचे चक्र अव्याहतपणे सुरू असावे लागते.

जनगणनेविषयी थोडे जास्त समजून घ्यायचे असेल तर इतिहासात डोकवावे लागेल. भारतातील पहिली जनगणना १८७२ साली झाली. त्या वेळी देशावर ब्रिटिशांचा अंमल होता. त्यांच्या मायदेशात अशा प्रकारची लोकांची मोजणी –

जनगणना होत असल्यामुळे त्यांना जनगणनेचे महत्व माहीत होते. आपल्या तंत्राने भारताचा कारभार चालविण्यासाठी त्यांना भारताविषयीही अशी माहिती आवश्यक वाटू लागली. १८६७ ते १८७२ या काळात त्यांनी जनगणना केली; परंतु हे काम एकाच वेळेस केले गेले नव्हते म्हणजे ते समकालिक (synchronous) नव्हते. त्यानंतर आणखी नऊ वर्षांनी म्हणजे १८८१ साली त्यांनी पुन्हा जनगणना केली. ती मात्र संपूर्णपणे समकालिक होती. या जनगणनेनंतर २०११ सालापर्यंत, म्हणजे १५व्या जनगणनेपर्यंत अव्याहतपणे, अधेमधे अनेक अडचणी येऊनदेखील दर १० वर्षांनी जनगणना होत राहिली. त्यात एकदाही खंड पडला नाही. अशा अखंडित मोठ्या जनगणनेचे हे जगातील उत्तम उदाहरण मानले जाते.

ब्रिटिशपूर्व काळातही त्या त्या काळातील काही विशिष्ट राज्यकर्त्यांना जनगणनेचे महत्व वाटले होते. त्यामुळे ब्रिटिशांच्या आधीही भारतात जनगणना झाली असल्याचे उल्लेख सापडतात. तो काळ होता इ.स.पूर्व ८०० ते इ.स.पूर्व ६००. त्यानंतर कौटिल्याच्या अर्थशास्त्रात म्हणजे इ.स.पूर्व ३२१ ते इ.स.पूर्व २९६ या कालखंडात! नंतर मात्र बराच काळ तशी काही माहिती मिळाली नाही. पुढे उल्लेख सापडला तो मुघल काळात, 'ऐन-ए-अकबरी'त, अबुल फझलच्या लेखनात. तो काळ होता इ.स.१५९५ ते इ.स.१५९६. अर्थात तेव्हाचा भारत अखंड भारत नव्हता. तो अनेक निरनिराळ्या राज्यांच्या अंमलाखालील म्हणूनच तुकड्यातुकड्यात विभागलेला होता. यानंतर वायव्य सरहद्द प्रांतासाठीचे लोकसंख्येचे आकडे उपलब्ध आहेत; परंतु तेही तुकड्यातुकड्यातील आणि निरनिराळ्या कालखंडांतील असल्यामुळे विश्वासार्ह मानले जात नाहीत.

वरील सर्व उदाहरणांतील लक्षात घेण्यासारखा मुद्दा म्हणजे लोकसंख्येचा आकडा सर्वसमावेशक नसला तरी ही प्रक्रिया अस्तित्वात होती. म्हणजेच लोकसंख्येची माहिती राज्यकर्त्यांना उपयोगाची असते याची त्यांना जाणीव होती.

अगदी पूर्वीच्या काळी जनगणनेची व्याप्ती अतिशय मर्यादित अशी होती. त्यात फक्त कुटुंबप्रमुख, सशक्त आणि तरुण पुरूष तसेच सरकारदरबारी नियमितपणे कर भरू शकतील - म्हणजे शेतकरी आणि व्यापारी - अशा व्यक्तींचीच मोजदाद होत होती. तरुण पुरूष मुख्यत: सैन्यात भरती करून घेण्यासाठी आवशयक होते. याखेरीज वेळप्रसंगी त्यांना काम करण्याची जबरदस्ती करणे शक्य होते. एकंदरीत तरुणांचा उपयोग राज्याचे सामर्थ्य वाढविण्यासाठी होता तर अधिकाधिक करदाते राज्याची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी गरजेचे होते. अशा प्रकारच्या मोजणीत स्त्रिया,

लहान मुले, वृद्ध तसेच अपंग वा आजारी व्यक्तींचा समावेश केला जात नसे. त्यामुळे ही मोजणी त्या प्रदेशातील लोकांची प्रातिनिधिक मानली जात नसे. ही पूर्व–आधुनिक (pre-modern) जनगणना. ही एक प्रकारे अपूर्ण होती. इतर बाबतींत होणाऱ्या बदलांप्रमाणेच जनगणनेच्या प्रक्रियेच्या तंत्रातही बदल होत गेले आणि आधुनिक (modern) जनगणनेचा काळ सुरू झाला.

आधुनिक जनगणना मात्र पूर्ण आहे. कारण त्यात त्या त्या प्रदेशातील सर्व लोकांचा समावेश असतो. आधुनिक जनगणनेच्या व्याख्येत चार गोष्टी अंतर्भूत आहेत. (१) वैयक्तिक गणना (२) त्या प्रदेशातील सर्व व्यक्तींचा समावेश (३) समकालिकता (४) ठरवलेली वारंवारिता. भारतीय जनगणना या चारही बाबी लक्षात घेऊनच करण्यात येते.

जनगणना करण्याच्या दोन पद्धती आहेत. ज्या वेळेस जनगणना होत असेल त्या वेळी ती व्यक्ती ज्या ठिकाणी सापडेल त्या ठिकाणी मोजणे किंवा दुसरी पद्धत म्हणजे ज्या ठिकाणी व्यक्ती नेहमी राहते त्या ठिकाणी मोजणे. या तंत्रांना अनुक्रमे de facto आणि de jure असे संबोधले जाते. १९३१ सालापर्यंत भारतातील जनगणना de facto पद्धतीने होत होत्या; नंतर १९४१ आणि १९५१ साली त्या de jure पद्धतीने झाल्या. त्या नंतर १९६१ सालापासून आतापर्यंत होणाऱ्या जनगणना extended de facto पद्धतीने होतात.

जनगणना करणे फार जिकिरीचे काम आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात एकाच वेळी सर्वच्या सर्व लोकांची मोजदाद करण्यासाठी यंत्रणाही तितकीच मोठी हवी. त्यामुळे ही प्रचंड जबाबदारी सरकारने – गृह मंत्रालयाने – स्वीकारली आहे. त्यासाठी Census Commissioner / Registrar General हा आय.ए.एस. दर्जाचा अधिकारी नियुक्त केला जातो. संपूर्ण जनगणनेची प्रक्रिया त्याच्या देखरेखीखाली पार पडते. त्या नंतर राज्य, जिल्हा, तालुका याप्रमाणे खाली जात जात ग्रामीण भागात गावपातळीवर आणि शहरी भागात विविध वॉर्ड पातळीपर्यंत जनगणना अधिकाऱ्यांची नेमणूक होते. अतिशय योजनाबद्ध रीतीने विविध सरकारी कर्मचारी आणि शिक्षक यांच्या सहभागाने हे महत्वपूर्ण काम केले जाते. गोळा झालेली सर्व माहिती एकत्रितपणे संकलित करून, तिचे वर्गीकरण करून, विविध प्रकारच्या सारण्यांच्या स्वरूपात ती उपलब्ध करून दिली जाते.

यासाठी जनगणनेच्या आधीच्या वर्षी एप्रिल ते सप्टेंबर या काळात सर्व वास्तूंच्या नोंदी केल्या जातात. सर्व वास्तूंवर नंबर घालून त्या वास्तू कशासाठी वापरल्या

जातात, त्यांची स्थिती कशी आहे याची माहिती नोंदवली जाते. यातील राहत्या घरांची संख्या निश्चित करून गृहयाद्या बनवल्या जातात. ती माहिती पुढच्या चरणासाठी म्हणजेच जनगणनेसाठी वापरण्यात येते. गृहयाद्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर ऑक्टोबर महिन्यात भारतातील बर्फाच्छादित प्रदेशात जनगणना केली जाते. त्या भागांत त्या नंतरच्या काळात बर्फवृष्टीमुळे / थंडीमुळे जनगणना करणे शक्य नसते. बाकीच्या सर्व प्रदेशातील जनगणना १ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी या काळात करण्यात येते. त्या नंतरचा आठवडा उजळणी फेरीसाठी (revision round) राखून ठेवलेला असतो. बर्फाच्छादित प्रदेशांसाठी उजळणी फेरी १ ऑक्टोबर ते ५ ऑक्टोबरपर्यंत होते. जर काही चुका असतील, घर बंद असेल, काही नवीन जन्म-मृत्यू झाले तर त्याची नोंद या काळात होते. भारतीय लोकसंख्येची संदर्भ तारीख (reference date) जनगणना वर्षीची १ मार्च ही असते.

सध्याच्या काळात माहिती जमविण्यासाठी आणि ती संगणकात भरण्यासाठी OCR तंत्राचा वापर केला जातो. त्यामुळे माहिती भरण्यासाठीचा वेळ वाचतो शिवाय भरलेली माहिती बिनचूक असते. या सर्व कारणांमुळे मार्च महिन्याच्या अखेरीसच लोकसंख्येची अगदी प्राथमिक स्वरूपातील माहिती उपलब्ध होते. त्यासाठी फार काळ तिष्ठत बसावे लागत नाही. त्या नंतर विविध प्रकारच्या सारण्या हळूहळू प्रसिध्द होऊ लागतात, काही सारण्या येण्यास विलंबही लागू शकतो; परंतु वेळोवेळी उपलब्ध होत असलेल्या माहितीवरून समाजाचे चित्र स्पष्ट होत जाते.

भारतीय जनगणनेसंबंधी १८४८ साली एक कायदा संमत झालेला आहे. त्यानुसार जनगणनेसाठी जे प्रश्न विचारले जातात त्याबद्दल खरी माहिती देणे कायद्याने सर्व नागरिकांना बंधनकारक आहे. याबरोबरच सरकारने नागरिकांनाही गोपनीयतेचे वचन दिले आहे. दिलेली माहिती पूर्णपणे गोपनीय असून ती फक्त जनगणनेच्या कामासाठीच वापरली जाईल, तिचा कोणताही दुरुपयोग होणार नाही, कुठल्याही कारणासाठी, अगदी न्यायालयातदेखील कोणाही विरुध्द ही माहिती वापरण्यात येणार नाही. अशा तरतुदींचा त्यांत अंतर्भाव आहे. अशा प्रयत्नांमुळे / कायद्यामुळे सर्व नागरिकांना खरी माहिती देण्याबाबत विश्वास वाटतो आणि देशाच्या स्थितीचे खरेखुरे चित्र उभे राहू शकते. घरासंबंधी तसेच वैयक्तिक माहितीच्या बरोबरच गावपातळीवरची तसेच शहरी वॉर्ड पातळीवरची माहितीही यावेळेस संकलित करून प्रसिद्ध करण्यात येते. ती माहिती त्या त्या भागातील लोकसंख्येबरोबरच विकासाची पातळीही दर्शवते. त्या भागातील उपलब्ध सर्व सेवासुविधांच्या एकत्रित नोंदींची उपयुक्तता अनन्यसाधारण आहे.

जनगणना हा लोकसंख्येसंबंधी सर्व काही जाणून घेण्याचा अतिशय मूलभूत असा स्त्रोत आहे. संपूर्ण देशाची माहिती, देशातील प्रत्येक व्यक्तीची माहिती जनगणनेत असल्यामुळे येणारे आकडे हे खरे आकडे असतात, ते कुठल्याही गृहीतकांवर आधारलेले अनुमान नसते. त्यामुळे त्या अनुषंगाने येणाऱ्या त्रुटीही त्यात नसतात. जर त्रुटी असतीलच तर त्या काही भाग नजरचुकीने वगळला जाण्यामुळे (coverage error) किंवा लिहिताना काही चूक झाल्यामुळे (content error). एवढ्या प्रचंड कामात आणि मोठ्या आकड्यात अशा त्रुटी नगण्यच ठरतात.

२०११ साली झालेली १५ वी जनगणना आत्तापर्यंतची सर्वांत मोठी जनगणना होती. यात ३५ राज्ये/संघराज्ये, ६४० जिल्हे, ५६९१ तालुके, ८००१ शहरे आणि ६४०८५२ गावांचा समावेश होता. एकूण २४० दशलक्ष घरातून १२१ कोटी व्यक्तींची नोंद करण्यात आली.

जणगणनेत गोळा करण्यात येत असलेल्या माहितीचा धांडोळा घ्यायचा झाला तर असे चित्र दिसते–

**(१) घरासाठी प्रश्नावली :** घराबद्दलच्या प्रश्नावलीत घराची, मालमत्तेची, तसेच घरातील सोयीसुविधांबद्दलची खालील माहिती असते.

• कुटुंबप्रमुखाचे नाव • घर बांधण्यासाठी वापरलेले साहित्य • घराची स्थिती • घराची मालकी • घरातील खोल्यांची संख्या • घरात राहणाऱ्या जोडप्यांची संख्या

**सोयीसुविधा :** • पिण्याच्या पाण्याची उपलब्धता व स्त्रोत • दिवाबत्ती • शौचकूप • न्हाणीघर • सांडपाण्याची जोडणी • स्वतंत्र स्वयंपाकघर • स्वयंपाकासाठी इंधन

**मालमत्ता :** • रेडीओ/transistor • दूरचित्रवाणी संच • संगणक/laptop • फोन/मोबाइल फोन • सायकल • दुचाकी • चारचाकी

**(२) वैयक्तिक माहिती**

**प्रत्येक व्यक्तीसाठी लोकसांख्यिकीय माहिती :** • व्यक्तीचे नाव • कुटुंबप्रमुखाशी नाते • लिंग • जन्मतारीख/वय

**वैवाहिक स्थिती :** • सध्याची वैवाहिक स्थिती • लग्नाच्या वेळचे वय

**सांस्कृतिक :** • धर्म • अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती • अपंगत्व • मातृभाषा • इतर भाषा

**शैक्षणिक :** • शैक्षणिक स्थिती • शाळा / कॉलेजमध्ये उपस्थिती • शिक्षणाची सर्वांत अधिक पातळी

**आर्थिक :** • कामाची स्थिती – मुख्य काम करणारे, अंशत: काम करणारे, काम न करणारे • कामाचा प्रकार • काम न करणारे – प्रकार • काम शोधणारे, कामासाठी उपलब्ध असणारे • बँक खात्याचा वापर

**कामाच्या ठिकाणी जाण्यासाठीचा प्रवास :**

• जाण्यासाठी प्रवास • वाहनाचा प्रकार

**स्थलांतर :** • जन्माचे स्थान/शेवटी राहिलेले ठिकाण • स्थलांतराचे कारण • स्थलांतराचा काळ

**जनन :** • एकूण जन्मलेली मुले • एकूण जिवंत मुले • मागील एक वर्षात जन्मलेली मुले

अशा सर्व माहितीचे वर्गीकरण करून विविध प्रकारच्या सारण्यांमध्ये माहिती उपलब्ध करून दिली जाते. त्यातील मुख्य सारण्या खालीलप्रमाणे असतात.

A सारणी – लोकसंख्या

B सारणी – आर्थिक

C सारणी – सामाजिक व सांस्कृतिक

D सारणी – स्थलांतर

F सारणी – जनन

H सारणी – घरे आणि मालमत्ता

या मुख्य सारण्यांबरोबरच काही विशिष्ट समाजघटकांसाठी स्वतंत्रपणे काही सारण्या तयार करण्यात येतात. त्यापैकी महत्त्वाच्या सारण्या खालीलप्रमाणे

• अनुसूचित जातींसाठी सारण्या

• अनुसूचित जमातींसाठी सारण्या

• झोपडवस्तीत राहणाऱ्यांसाठी सारण्या

• अपंग व्यक्तींसाठी सारण्या

• पूर्वी सैन्यात असणाऱ्यांसाठी सारण्या

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी १९५१ पासून माहिती गोळा केली गेली आणि १९६१ सालापासून ही सर्व माहिती स्वतंत्र सारण्यांच्या स्वरूपात प्रसिध्द करण्यास सुरुवात झाली तर १९९१ पासून तिची व्याप्ती वाढविण्यात आली. या सविस्तर माहितीमुळे त्यांच्यासाठी अधिक काय करता येईल याचा अंदाज येतो. त्यानुसार अनेक योजना राबविल्या जातात. नंतर होणाऱ्या जनगणनांत अशा सर्व योजनांना आलेले फळही दिसते.

१९९१ सालच्या जनगणनेपासून पाच प्रकारच्या अपंगत्वाविषयी माहिती संकलित करून तिच्या सारण्या प्रसिध्द केल्या जातात. विविध प्रकारच्या अपंगत्वात देश कुठे आहे तसेच कुठल्या राज्यात काही विशिष्ट अपंगत्व आढळते का आणि आढळत असल्यास किती प्रमाणात हे माहीत असणे गरजेचे आहेच. त्याखेरीज त्याला आळा कसा घालणार?

कुठल्याही शहरी भागात झोपडवस्तीत राहणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढत असल्याचे आपल्याला दिसते. त्याचे आकडे मात्र जनगणनेतच मिळतात. झोपडवस्तीवासियांविषयीची थोडी माहिती ५०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांत १९९१ साली गोळा करण्यात आली. त्याची व्याप्ती २००१ साली वाढवून ७४३ शहरांतील झोपडवस्ती भागातील माहिती जनगणनेत घेण्यात आली. त्यानंतर २०११ साली मात्र ही माहिती ४०४१ शहरांतून गोळा करून सविस्तरपणे सारण्या प्रसिध्द करण्यात आल्या.

भारतीय समाजात जातींचे महत्व वादातीत आहे; परंतु इतक्या सगळ्या जाती आणि पोटजातींचे वर्गीकरण करणे अवघड आणि त्याचे समाजकारण आणि राजकारण त्याहूनही अवघड आहे. १९३१ साली झालेल्या जनगणनेत जातींचा समावेश होता आणि संकलित माहितीचे जातनिहाय वर्गीकरणही केले होते. त्या नंतर मात्र इतकी वर्षे जनगणनेत जात समाविष्ट नव्हती. आता २०२७ साली होणाऱ्या जनगणनेत जातींचा समवेश केला आहे. या जनगणनेचे हे एक आकर्षण ठरण्याची दाट शक्यता आहे.

**३. शहरे आणि गावांची सूची**

शहरे आणि गावांची माहिती त्यासाठीच्या निराळ्या सारण्यांत संकलित केली जाते. त्या त्या भागातील सोयीसुविधा त्या अधोरेखित करतात.

ही सर्व माहिती पाहिली की राज्यकर्त्यांना / धोरणकर्त्यांना, संशोधकांना, शिक्षकांना, विद्यार्थ्यांना ती किती प्रकारे वापरता येईल ते वेगळे सांगायला नको.

जनगणनेच्या आकड्यांचा मुख्य उपयोग होतो तो धोरणकर्त्यांना. निरनिराळ्या क्षेत्रांतील प्रश्न योग्य तऱ्हेने हाताळण्यासाठी, कुठल्या प्रदेशात कुठल्या प्रकारचे किती लोक आहेत आणि त्यांच्यासाठी कोणत्या योजना राबवाव्या लागतील ह्याचा निर्णय याच माहितीवरून घेतला जातो. कुठे शाळा असाव्या, कुठे आणि किती महाविद्यालये असावी, कुठे दवाखाने असावे, कुठल्या प्रकारची वाहतूकव्यवस्था अधिक उपयोगाची ठरेल इथपासून ते लसीकरणासाठी कुठल्या भागात किती मुले आहेत, किती माता आहेत याचे आकडेही याच माहितीवरून काढले जातात.

याखेरीज देशातील साक्षरता किती, किती मुले शाळेत जातात, किती मुलांनी शाळा सोडली, कितीजण उच्चशिक्षित आहेत, ते काय काम करतात, कितीजण कामाच्या शोधात आहेत, शेतीवर आपले अवलंबित्व किती, किती भर उद्योगांवर आहे याचीही माहिती इथे मिळते. लोकसांख्यिकीय प्रक्रियेमुळे होणाऱ्या वयोगटातील बदलांवरून ज्येष्ठांचे समाजातील प्रमाण समजते आणि त्यांच्या वाढत्या वयाच्या गरजा कशा पूर्ण कराव्या लागतील याचा विचार करतानाही हीच माहिती वापरली जाते. कमी होत जाणारी मुलींची संख्या आणि वाढत जाणारी ज्येष्ठ स्त्रियांची संख्या यांचे परिणाम समजून घेण्यासाठी जनगणनेखेरीज कुठली माहिती वापरता येणार?

एकंदरीत आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपलब्ध माहितीचा मेळ घालता आला की हातात सोन्याची खाण आली असे समजण्यास हरकत नाही. ती सोन्याची खाण म्हणजे जनगणनेतून निर्माण होणारी प्रचंड माहिती आणि आकडे! तिचे पृथ:करण सर्वांनाच दिशादर्शक ठरू शकते यात शंका नाही.

भविष्यकाळातील नियोजनासाठी अचूक माहितीची गरज असते. उदाहरणादाखल, एखाद्या शहराची लोकसंख्या किती झाली, आधीच्या आकड्यात किती भर पडली, किती नवीन घरे वाढली याबरोबरच हे सर्व लोक कोणत्या वयोगटातील आहेत हे कळल्याशिवाय शहराचे नियोजन होणे अशक्य आहे. शहरातील झोपडवस्ती वाढली का, त्यात किती लोक राहतात हे निश्चित माहीत हवे. याच्याच अनुषंगाने देशाच्या कुठल्या भागात, कुठल्या भागातून स्थलांतर झाले, ते किती झाले आणि का हे जाणून घेणेही आवश्यक आहे. अनेक प्रकारच्या सरकारी योजना तयार करताना तसेच राबविताना ही माहिती असल्याखेरीज पुढे जाणे शक्य नाही. राजकारणासाठीही माहिती फार उपयुक्त आहे. देशपातळीवर तसेच राज्यपातळीवरही जेव्हा निवडणुका होतात तेव्हा उमेदवारांचे भवितव्य या सर्वांवरही अवलंबून असते, त्यामुळे त्यांचा अचूक आकडा राजकारण्यांनाही अपेक्षित आहे. २०२७ ची जनगणना आणखी महत्वाची ठरणार आहे ती या दोन गोष्टींमुळे!! आणि कदाचित म्हणूनच तिची निकड जाणवते आहे. (१) यात जातनिहाय लोकसंख्येचे आकडे मिळणार आहेत. आधीचे जातनिहाय आकडे जवळजवळ १०० वर्षांपूर्वीचे, म्हणजे १९३१ सालचे, आहेत. या आकड्यांनुसार इतर अनेक गोष्टींबरोबरच काही जातींसाठी आरक्षणाचा विचार होण्याची शक्यता आहे. (२) मतदारसंघांची फेररचना हा गेली अनेक वर्षे चर्चेत असणारा मुद्दा आहे. आता जागा वाढवल्या असल्या तरी त्यांची राज्यनिहाय विभागणी अजूनपर्यंत झालेली नाही. लोकसंख्येचे आकडे येण्यापूर्वी ती झाली तर ती विभागणी न्याय्य आहे की नाही हे लोकसंख्येचे आकडेच ठरवतील.

# उजळणी-१

## बुद्ध की कार्ल मार्क्स ?

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

---

## महात्म्याचा आकृतिबंध

■ रा. ग. जाधव

# उजळणी-१

# बुद्ध की कार्ल मार्क्स

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

मी भाषणासाठी मान्यता दिली आहे खरी, परंतु इथे उपस्थित झाल्यावरच ही अनपेक्षित गोष्ट माझ्यावर सोपविण्यात आली. तुम्हा लोकांपुढे व्याख्यान द्यावे लागेल याची मला किंचितही पूर्वसूचना नव्हती. मी कोणत्या विषयावर बोलू इच्छेन ह्याची मला विचारणा केल्यावर 'बौद्धधर्मातील अहिंसा' हा विषय मी सांगितला होता. परंतु सर्वसाधारण मी ज्या विषयाचा ओझरता उल्लेख केला होता त्याच विषयावर म्हणजे 'बौद्धधम्म व साम्यवाद' ह्यावर मी बोलावे असे परिषदेला उपस्थित असलेल्या बहुसंख्यांक लोकांना वाटत असल्याचे मला सांगण्यात आले. भाषणाचा विषय बदलण्यास जरी मी मान्यता दिली असली तरी प्रामाणिकपणे मला हे सांगितले पाहिजे की, हा विषय आकस्मिकपणे सोपविला गेला असल्याने एवढ्या महान व विस्तृत विषयावर बोलण्याची माझी तयारी झालेली नाही. हा विषय केवळ महान व विस्तृतच नाही तर अत्यंत भारदस्त आहे. या भारदस्त विषयाच्या दडपणाखाली अर्धेअधिक जग सापडलेले आहे. एवढेच नव्हे तर बौद्ध राष्ट्रांतील तरुण विद्यार्थी वर्गसुद्धा या विषयाच्या मगरमिठीत सापडलेला आहे. ही दुसरी बाब मला अत्यंत चिंताजनक वाटते.

साम्यवाद जी जीवनप्रणाली सांगते त्या जीवनप्रणालीपेक्षा बौद्ध धम्माने सांगितलेली जीवनप्रणाली उत्कृष्ट व सरस आहे, अशी प्रशंसा जोपर्यंत बौद्ध राष्ट्रांतील तरूण पिढी करीत नाही तोपर्यंत बौद्ध धर्माचे भवितव्य उज्ज्वल आहे असे म्हणता येणार नाही. बौद्ध धर्मावरील श्रद्धा दोनएक पिढ्याही तग धरू शकणार नाही. यास्तव बौद्ध धम्मावर ज्यांची दृढ श्रद्धा आहे अशा लोकांनी तरूण पिढीस बौद्ध धर्माची महत्ता पटवून देऊन साम्यवादाला बौद्ध धर्मच पर्याय आहे, किंबहुना बौद्ध धर्मच एकमेव सर्वोत्तम जीवनमार्ग आहे असे सांगणे अत्यंत आवश्यक आहे. ही गोष्ट पटवून दिल्यावरच बौद्ध धर्म टिकवून धरण्याची आशा बाळगता येऊ शकते. आपण हेही

तेवढेच ध्यानात घेतले पाहिजे की, युरोपमधील बहुसंख्यांक लोक व आशियामधील बहुसंख्यांक तरूण असा दृष्टिकोन बाळगतात की, आजच्या जगात कार्ल मार्क्स हाच केवळ एक पूजनीय महापुरुष किंवा प्रेषित आहे. त्याचबरोबर ते असाही विचार प्रदर्शित करतात की, बौद्ध भिक्खु संघातील फार मोठा भाग केवळ निरुपयोगीच नव्हे तर एक मोठे पिवळे संकट आहे. अशा प्रकारची विचारसरणी कशाचे द्योतक आहे हे भिक्खुंनी लक्षात घेतले पाहिजे. तिच्यामागची पार्श्वभूमी त्यांनी समजून घेतली पाहिजे आणि कार्ल मार्क्सशी तुलना केली जावू शकेल अशा प्रकारे स्वतःला घडवून घेण्याची त्यांनी पराकाष्ठा करावयास पाहिजे. तेव्हाच बौद्ध धर्माचे श्रेष्ठत्व शाबीत केले जावू शकेल.

या प्रास्ताविकानंतर बौद्ध तत्त्वज्ञान व मार्क्सवाद किंवा साम्यवाद ह्यातील ठळक वैशिष्ट्यपूर्ण मुद्दे कोणते आहेत ह्याबद्दल मी आपणास विवेचन करून सांगेन. हे विवेचन बुद्धाचे तत्त्वज्ञान व मार्क्सचे तत्त्वज्ञान यांच्या आदर्शातील साम्य व भेद ह्या संबंधात असेल. जीवनातील उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी साम्यवादी जीवनमार्गापेक्षा बौद्धजीवनमार्ग मानवी जीवनाचे ध्येय हस्तगत करण्यात चिरंतन ठरू शकेल किंवा नाही याचाही त्यात उहापोह असेल. जो जीवनमार्ग अल्पकालीन असेल, रानावनातून भटकविणारा असेल किंवा अराजकतेकडे घेवून जाणारा असेल अशा जीवनमार्गाचा पाठपुरावा करणे उचित ठरणार नाही. परंतु तुम्हाला अवलंबण्यास सांगितलेला मार्ग जर मंदगतीचा व लांब पल्ल्याचा असेल, तथापि तो खात्रीचा असून सुरक्षित व भक्कम पायावर पोहचविणारा असेल आणि तुमच्या आदर्श तत्त्वांना साहाय्यभूत ठरविणारा व तुमच्या जीवनाला स्थायीभाव देणारा असेल तर तोच मार्ग चोखाळणे न्यायाचे ठरेल. कमी अंतराचा ‘शॉर्टकट’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काटेरी मार्गापेक्षा मंदगतीचा लांब पल्ल्याचा मार्गच आक्रमण करीत राहाणे केव्हाही रास्त असते. जीवनातले ‘शॉर्टकट’ नेहमीच घातकी असतात. नुसतेच घातकी नव्हे तर महाघातकी असतात, हे सतत ध्यानात ठेवले पाहिजे.

आता मी माझ्या प्रमुख विषयाला हात घालतो. मार्क्सच्या साम्यवादाची विचारसरणी तरी काय आहे? त्याचे मूलभूत तत्त्वज्ञान तरी काय आहे? साम्यवादी विचारसरणीचा मूलारंभ असा आहे की, या जगात पिळवणूक चाललेली आहे. ही पिळवणूक धनिकांकडून गरिबांची होत आहे. कारण धनिकांना संपत्तीची हाव आहे. त्यांना अधिकाअधिक मालमत्ता हवी आहे आणि त्यासाठी ते जनसमुदाय गुलाम करीत आहेत. ही गुलामगिरी शेवटी यातना, दुःख व गरिबी यांच्या निर्मितीस

कारणीभूत होत आहे. हेच मार्क्सवादाच्या प्रारंभाचे मूळ आहे. मार्क्स ह्याने 'पिळवणूक' या शब्दप्रयोगाचा उपयोग केला आहे. ही पिळवणूक नष्ट करण्यासाठी मार्क्सने कोणती उपाययोजना सांगितली आहे? पिळवणूक होणाऱ्या या एका वर्गाचे दैन्य व दुःख नष्ट करण्यासाठी वैयक्तिक मालमत्तेवर प्रतिबंध घातला पाहिजे असे मार्क्सचे सांगणे आहे. व्यक्तीशः कोणीही मालमत्ता बाळगू नये किंवा धनसंचय करू नये. कारण कार्ल मार्क्सच्या तांत्रिक भाषेत सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, कामगारांच्या किंवा मजुरांच्या श्रमशक्तीपासून उत्पादित झालेले अतिरिक्त धन स्वतःच घेणारा किंवा स्वतःच गिळंकृत करणारा हा खाजगी मालमत्तेचा एक मालक बनतो. कामगार आपल्या निढळाच्या घामाने उत्पादन वाढवितो व अतिरिक्त धन मिळवून देतो. परंतु ह्या अतिरिक्त धनावर त्या कामगारांचा कोणताच अधिकार राहात नाही. त्याला त्यामधून काहीही हिस्सा मिळत नाही. ते सारे अतिरिक्त धन केवळ मालकच बळकावून बसतो. ही बाब लक्षात घेवून कार्ल मार्क्सने असा प्रश्न उपस्थित केला की, कामगारांनी आपल्या श्रमशक्तीच्या जोरावर निर्माण केलेल्या अधिक उत्पादित धनावर मालकाने काय म्हणून हक्क सांगावा? मार्क्सच्या मतानुसार अतिरिक्त धनावर मालकाचा केव्हाही अधिकार असता कामा नये. अतिरिक्त धनावर केवळ राज्याचाच अधिकार असावा; आणि हे राज्यसुद्धा कामगारांचे असावे. याच कल्पनेवर मजुरांच्या किंवा कामगार वर्गाच्या हुकूमशाहीचा सिद्धांत मार्क्सने प्रस्थापित केला. मार्क्सने जे सिद्धांत प्रस्थापित केले, त्यातील हा एक तिसरा सिद्धांत आहे. कामगार वर्गाची हुकूमशाही ह्याचा अर्थ मार्क्स असा करतो की, शासन हे शोषिकांचे म्हणजे कामगारांची पिळवणूक करणाऱ्यांचे नसावे. ते शोषितांचे म्हणजे पिळवणूक होत असलेल्या कामगारांचे असावे. अशा प्रकारचे कार्ल मार्क्सचे मूलभूत सिद्धांत आहेत. याच सिद्धांतावर आधारित साम्यवादाची उभारणी रशियात झालेली आहे. या सिद्धांतात भरही घातली गेलेली आहे आणि भर घालणे सतत चालूही आहे. मात्र मूलभूत सिद्धांत सुरुवातीस सांगितल्याप्रमाणेच कायम आहेत.

मी आता क्षणभर बुद्ध तत्त्वज्ञानाकडे वळतो. कारण कार्ल मार्क्सने उपस्थित केलेल्या मूलभूत विचारसरणीच्या बाबतीत बुद्धाचे काही म्हणणे आहे का हेही पाहाणे आवश्यक आहे. मार्क्सने गरिबीच्या संबंधी किंवा कामगारांच्या पिळवणुकीसंबंधी प्रश्न उपस्थित करून आपल्या मार्क्सवादाची किंवा साम्यवादाची उभारणी केलेली आहे. बुद्ध काय म्हणतो? बुद्धाने कोठून सुरुवात केलेली आहे? बुद्ध तत्त्वज्ञानाची किंवा बुद्धाच्या धम्माची इमारत कोणत्या पायावर उभारली केली

गेली आहे? कार्ल मार्क्सप्रमाणे बुद्धानेही २५०० वर्षापूर्वी म्हणजे कार्ल मार्क्सच्या कित्येक वर्षे अगोदर हीच गोष्ट सांगितली आहे. बुद्धाने म्हटले, ''जगात दुःख आहे.'' बुद्धाने कार्ल मार्क्सप्रमाणे 'पिळवणूक' हा शब्दप्रयोग मात्र उपयोगात आणला नाही. पिळवणुकीमधून जे दुःख, दैन्य निर्माण होते त्याच दुःखाची कल्पना देवून बुद्धाने आपल्या तत्त्वज्ञानाची, आपल्या धम्माची उभारणी केली. 'जगात दुःख आहे' हे जगद्मान्य सत्य आहे असे सांगून बुद्धाने दुःखाची परिभाषा निरनिराळ्या अर्थाने केली. दुःख म्हणजे पुनर्जन्म, दुःख म्हणजे जीवनमरणाचा फेरा असाही अर्थ बुद्धाने केलेला आहे. परंतु या अर्थाशी मी सहमत नाही. दुःख हा शब्द दारिद्र्य, गरिबी ह्या अर्थानेही उपयोगात आणला गेला असल्याचे बौद्ध वाङ्मयातून दिसून पडते. तेव्हा बौद्ध तत्त्वज्ञानाचा मूलभूत पाया व कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा मूलभूत पाया यात काहीही फरक आढळत नाही. याचाच अर्थ असा की, कार्ल मार्क्सने प्रस्थापित केलेला सिद्धांत हाही नवीन नाही. तेव्हा जीवनाचा मूलभूत पाया शोधण्यासाठी कोणत्याही बौद्ध बांधवास कार्ल मार्क्सचे दार ठोठावण्याची काहीही गरज नाही. बुद्धाने तो पाया केव्हाचाच अगदी उत्तम प्रकारे प्रस्थापित करून ठेवलेला आहे आणि तो त्याने आपल्या पहिल्या प्रवचनातील उपदेशात केलेला आहे. हे प्रवचन बौद्ध वाङ्मयात 'धम्मचक्रप्रवर्तन सुत्त' या नावाने ओळखले जाते. ज्या लोकांच्या मनावर कार्ल मार्क्सच्या विचाराचा पगडा बसलेला आहे त्यांना मला हेच सांगावयाचे आहे की तुम्ही धम्मचक्रप्रवर्तन सुत्ताचा अभ्यास करा व बुद्धाने काय म्हटले आहे हे समजून घ्या. मला खात्री आहे की, तुम्हाला त्यात मानवी जीवनसंग्रामाचे उत्तर खचितच आढळेल. बुद्धाने आपल्या तत्त्वज्ञानाची किंवा धम्माची उभारणी ईश्वर, आत्मा किंवा अशाच अनाकलनीय अति मानवी बाबींवर केव्हाही केलेली नाही. त्याने मनुष्याच्या वास्तव जीवनाकडेच अंगुलीनिर्देश करून आपले सारे तत्त्वज्ञान विशद केलेले आहे. मनुष्य यातना, दुःख यानी पिडलेला असतो, ही मानवी जीवनाची वास्तवता आहे. केवळ मार्क्सनेच ह्या गोष्टींचा उहापोह केला असे नव्हे तर त्याच्या जन्माअगोदर दोन हजार वर्षांपूर्वी बुद्धाने या गोष्टी जाणल्या व त्यावर उपायसुद्धा सांगितले, हे एक विशेष आहे. हे तुम्ही समजून घेतले पाहिजे. याप्रमाणे गरिबीच्या संदर्भात बुद्धाच्या तत्त्वप्रणालीत व कार्ल मार्क्सच्या तत्त्वप्रणालीत कमालीचे साम्य आहे, हे तुम्हास कळून चुकेल.

मार्क्सच्या विचारानुसार कामगारांच्या पिळवणुकीचा प्रतिरोध करण्यासाठी उत्पादनापासून प्राप्त होणारी संपत्ती राज्याने आपल्या मालकिची करावयास पाहिजे.

साऱ्या जमिनी राज्याच्या मालकिच्या असाव्यात, साऱ्या उद्योगधंद्यावर केवळ राज्याचाच अधिकार असावा. म्हणजेच व्यक्तिगत मालकास हुकूमत गाजविण्यास वाव मिळणार नाही. तसेच मजुरांच्या श्रमशक्तीने निर्माण केलेल्या उत्पादित वस्तूवरील अतिरिक्त फायद्याचा लाभ त्या मालकास होणार नाही व मजुरांना लुबाडण्याचा प्रसंगच येणार नाही. अशी ही पिळवणुकीच्या संदर्भात कार्ल मार्क्सची विचारसरणी आहे.

व्यक्तिगत मालकी हक्काच्या संदर्भात बुद्धाची विचारसरणी काय आहे ते आपण तपासून पाहू या. यासाठी आपणास बौद्ध भिक्खुसंघाचा विचार करावा लागेल आणि बुद्धाने भिक्खुसाठी लावलेल्या त्यांच्या जीवनविषयक नियमांची चिकित्सकपणे परीक्षा करावी लागेल. बुद्धाने भिक्खुंसाठी असे काय नियम केले आहेत? बुद्धाने कटाक्षाने सांगितले की, कोणत्याही बौद्ध भिक्खुने खाजगी मालमत्ता बाळगता कामा नये. वस्तुतः बोलावयाचे झाल्यास कोणत्याच भिक्खुजवळ स्वायत्त मालमत्ता असू नये, असा कडक निर्बंध असूनही आज तुम्हाला अपवादात्मक काही उदाहरणे दिसतील. काही देशातील भिक्खुवर्गात त्यांच्याकडे वरील मालमत्ता असल्याचे मी स्वतः पाहिले आहे. परंतु बहुसंख्यांक भिक्खुंजवळ कोणतीच मालमत्ता नाही. मालमत्ता बाळगण्याच्या बाबतीत बौद्ध भिक्खुसंघाचे निर्बंध एवढे कडक आहेत की, रशियातील साम्यवाद्यांनी केलेले नियमसुद्धा एवढे कडक नसावेत. हा विषय अद्याप कोणीही विचारविनिमयासाठी न घेतलेला व निश्चित निर्णयाप्रत कोणीही न पोहचू शकलेला असा, म्हणून मी आज हाती घेतलेला आहे.

भिक्खुसंघ निर्मितीमागे बुद्धाचे कोणते उद्दिष्ट असावे? भिक्खुचा संघ असावा असे त्याला का वाटले असावे? इतिहासाचा मागोवा जर आपण घेतला तर असे आढळून येते की, बुद्ध जेव्हा आपल्या धम्माचा प्रचार व प्रसार करीत होता तेव्हा 'परिव्राजक' म्हटले जाणारे लोक इतस्ततः भटकत होते. एवढेच नव्हे तर बुद्धाच्या अगोदरपासून ते वावरत होते. 'परिव्राजक' ह्या शब्दाचा अर्थ निराश्रित म्हणजेच ज्यांना घरदार नाही असे लोक़ असा होतो. आर्यकाळात आर्यांच्या निरनिराळ्या टोळ्या इतर वन्य टोळ्यांसारख्या आपापसात लढत होत्या. विजयी टोळ्या स्थायिक होऊन राहात. पराभूत टोळ्यातील काही लोक मात्र आपले घरदार, मालमत्ता सोडून केवळ भ्रमंती करीत राहात. स्थायिक जीवन त्यांनी कधीही स्वीकारले नाही. अशा भटकणाऱ्या लोकांना कालान्तराने 'परिव्राजक' म्हटले गेले. बुद्धाने अशा भटकत राहाणाऱ्या परिव्राजक लोकांना एकत्रित करून त्यांचा संघ निर्माण करण्याचे व त्यांच्या भ्रमणजीवनाला नियमबद्ध करण्याचे फार मोठे मोलाचे कार्य केले. ज्या

नियमांनी अशा परिव्राजकांना बद्ध केले गेले त्या साऱ्या नियमांचा उल्लेख आपणास 'विनयपिटकात' आढळतो. परिव्राजक बौद्ध भिक्खु बनले व विनयपिटकात निर्देशिलेल्या नियमांप्रमाणे काटेकोरपणे वागू लागले. त्यातील नियमाप्रमाणे भिक्खुला मालमत्ता जमविण्याची किंवा बाळगण्याची परवानगी नव्हती. भिक्खुला पुढील केवळ सात वस्तुच बाळगण्यास सांगितले गेले होते. एक वस्तरा, एक लोटा, एक भिक्षापात्र, तीन चिवरे आणि एक सुई या त्या सात वस्तु होत. साम्यवादाच्या मूळ गाभ्याबरहुकूम व्यक्तिगत मालमत्ता असू नये अशी जर बाब असेल तर विनयपिटकातील बौद्ध भिक्खुसाठी सांगितलेला एवढा कडक निर्बंध कुठेतरी असेल का? मला तरी असा नियम कुठे आढळत नाही. म्हणून व्यक्तिगत मालमत्ता नसण्याच्या बाबतीत साम्यवादी मतप्रणालीमध्ये एखांद्या आजच्या पिढीतील तरुणास आकर्षण वाटत असेल, तर त्याने खचितच बौद्ध तत्त्वज्ञानाच्या विनयपिटकात डोकवावे. त्याला ज्याचा शोध घ्यावयाचा आहे, ते त्यात निश्चितच गवसेल. परंतु प्रश्न असा निर्माण होतो की, व्यक्तिगत मालमत्ता नसण्याचा नियम साऱ्या समाजाला कसा काय लागू करता येईल व केव्हापर्यंत लागू करता येईल? अर्थात ही सारी बाब उपाययोजना, काळ, परिस्थिती व मानवी जीवनाचा विकास ह्यावर आधारित आहे. तात्त्विकदृष्ट्या विचार करता व्यक्तिगत मालमत्ता काढून घेणे खरोखरीचं चुकीचे आहे का? यदाकदाचित एखाद्यास खाजगी मालमत्ता बाळगण्याची इच्छा असेल, तर बौद्धधर्म आड येईल का? निश्चितच नाही. कारण बौद्ध भिक्खुसंघाची निर्मिती करताना बुद्धाने काही सवलती मान्य केल्या आहेत. आवश्यक गरजा भागविण्यास लागणारी मालमत्ता बाळगण्यास बुद्धाने मनाई केलेली नाही, ही बाब विशेषत्त्वाने ध्यानात घेतली पाहिजे.

आता ह्याच बाबीच्या दुसऱ्या मुद्द्यांकडे आपण वळू. साम्यवाद घडवून आणण्यासाठी कार्ल मार्क्स किंवा साम्यवादी लोक कोणता मार्ग अवलंबवावा म्हणून सांगतात? हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. साम्यवाद (म्हणजेच दुःखाचे अस्तित्व मान्य करून व्यक्तिगत मालमत्ता नष्ट करणे हा वाद) प्रस्थापित करण्यासाठी साम्यवाद्यांचा मार्ग अत्याचारी मार्ग आहे, विरोधकांची हत्त्या करण्याचा मार्ग आहे आणि ह्यातच बुद्ध व कार्ल मार्क्स यांच्या उपाययोजनांच्या मार्गात मूलभूत फरक आहे. बौद्ध तत्त्वज्ञान किंवा बौद्धधम्म प्रस्थापित करण्यासाठी लोकांची मने वळविणे हा बुद्धाचा सनदशीर मार्ग आहे. नैतिक शिकवणीने व प्रेमाने लोकांची मने वळविणे यावर बुद्धाचा भर आहे. बुद्धाला विरोधकांना जोरजबरीने किंवा सत्तेने जिंकावयाचे नसून प्रेमाने व आपुलकीने जिंकावयाचे आहे. हा मूलभूत फरक लक्षात घेतला

म्हणजे असे कळून येते की, तत्त्वज्ञान प्रस्थापण्यासाठी बुद्धाला रक्तपात मान्य नाही. हिंसा मान्य नाही. उलट साम्यवाद्यांना हिंसेचाच मार्ग पसंत आहे. या मार्गाने साम्यवाद्यांना ताबडतोब फलप्राप्ती होते किंवा त्यांची उद्दिष्टे जलद सफल होतात यात मुळीच वाद नाही. कारण तुम्ही जेव्हा मनुष्य निर्मूलनाचेच तत्त्व अंमलात आणता तेव्हा तुम्हाला विरोध करणारा किंवा तुमचा प्रतिकार करणाराच कोणी उरत नाही. अर्थात ही सफलता केवळ दिखाऊच असते. मार्क्सवादाच्या तुलनेत बुद्धाचा मार्ग मंदगतीचा व लांब पल्ल्याचा आहे. कदाचित तो लोकांना कंटाळवाणाही वाटण्याचा संभव आहे. कारण सफलता फार उशिरा प्राप्त होते. मात्र हेही तेवढेच खरे की त्या मार्गात सुरक्षितता आहे. तुमच्या जीवाची हमी आहे. यास्तव तुम्ही तुमच्या आदर्शाबरहुकूम मार्ग आक्रमित असताना बुद्धाच्याच बिनधोक मार्गावर पाऊल ठेवणे हितावह होणार आहे.

मी माझ्या साम्यवादी मित्रांना नेहमी दोन तीन प्रश्नांची उत्तरे मागत असतो. परंतु मला प्रामाणिकपणे सांगितले पाहिजे की, माझ्या प्रश्नांची उत्तरे देण्यास ते समर्थ नाहीत. ते मजूर वर्गाची हुकूमशाही रक्तपाताने प्रस्थापित करू इच्छितात. राजकीय सत्तेचे वर्चस्व असणाऱ्यांना ते नेस्तनाबूत करू इच्छितात. त्यांच्या मतानुसार लोकसभेत


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे–तेलंग–चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/– रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

प्रतिनिधित्व असू शकत नाही. मताधिकार असू शकत नाही. त्यांना केवळ राज्याची एकतंत्री महाप्रजा म्हणून राहावयाचे आहे. त्यांना सत्तावाटप किंवा अधिकार वाटप न करता राज्य करावयाचे आहे. त्यामुळे त्यांना मी असा प्रश्न करतो की, हुकूमशाही ही लोकांवर राज्य करण्याची योग्य पद्धती आहे का? त्यावर ते असे उत्तर देतात की, हुकूमशाही त्यांना केव्हाही मान्य नाही. मग मी त्यांना परत विचारतो की, मजुरांची तरी हुकूमशाही त्यांनी का मान्य करावी? त्यावर ते उत्तर देतात की, सध्याचा काळ निर्वाणीचा काळ असल्याने कामगारांची हुकूमशाही निर्माण होणे अत्यावश्यक आहे. मजूर वर्गाची हुकूमशाही निर्माण झाल्याशिवाय प्रस्थापित भांडवलदारांचा किंवा अतिरिक्त धन गिळंकृत करणाऱ्या मालक वर्गाचा नायनाट होणार नाही. अजून त्यांना प्रश्न केला की, हा निर्वाणीचा कालावधी तरी केवढा आहे? वीस वर्षे, चाळीस वर्षे की पन्नास वर्षे? याला त्यांचे निश्चित उत्तर नाही. ते गुळमुळीत उत्तर देतात की, साम्यवाद स्थिर झाल्यावर मजूरवर्गीय हुकूमशाही आपोआपच नष्ट होईल. कल्पना करू या की ती आपोआपच नष्ट झाली. मग पुढे काय? तिची जागा कोण घेईल? मनुष्याला कोणत्याच प्रकारच्या शासनाची आवश्यकता वाटणार नाही काय? ह्या प्रश्नाचे उत्तर त्यांच्याकडे नाही.

याच संदर्भात जेव्हा आपण बुद्धाकडे वळतो आणि त्याच्या धम्मासंबंधी प्रश्न उपस्थित करतो तेव्हा तो काय म्हणतो? बुद्धाने जगाला एक अत्यंत महान अशी गोष्ट सांगितलेली आहे. मनुष्याची मनोधारणा बदलल्याशिवाय आणि पर्यायाने जगाची मनोधारणा बदलल्याशिवाय जगाची सुधारणा किंवा उन्नती होवू शकणार नाही असे बुद्धाचे सांगणे आहे. बुद्धाच्या शिकवणुकीप्रमाणे मनुष्याची मनोधारणा बदलली गेली व त्यानुसार त्याने साम्यवादी विचारसरणी स्वीकारून तीवर निष्ठेने प्रेम केले व ती अंमलात आणण्याचा प्रयत्न केला, तर ती खचितच स्थायी स्वरूप प्राप्त करू शकेल आणि अशा वेळेस मनुष्याला कायदेकानूनच्या बेडीत अडकविण्यास सैनिकी किंवा पोलिसी कारवाईची जरुरी पडणार नाही. असे का घडू शकेल? याला उत्तर असे की, नैतिकतेने वागण्यास व योग्य मार्गाने चालण्यास तुमच्या मनाची जडणघडणच बुद्धाने तयार केलेली असेल. तुमचे मनच चिरंतन स्वरूपात सन्मार्गी झालेले असेल.

साम्यवादाची उपाययोजनासंबंधाची विचारसरणी जुलूमजबरदस्तीवर आधारलेली आहे. कल्पना करा की, उद्या रशियातील साम्यवादी हुकूमशाही बारगळली किंवा तशी चिन्हे दिसू लागली तर काय होईल? साम्यवादाची अवस्था कशी होईल हे जाणून घेण्यास मी निश्चितच उत्सूक राहीन. माझ्या कल्पनेप्रमाणे राज्याच्या मालकीची

मालमत्ता बळकावण्यास रशियन लोक परस्परात रक्तपात घडवून आणतील. आपापसात लढाया करतील. ही परिणती अपरिहार्य अशीच राहील. कारण रशियातील लोकांनी साम्यवादी विचारसरणी सहजासहजी स्वीकारलेली नाही. आपणहून ती त्यांनी मान्य केलेली नाही. ती त्यांच्यावर जबरदस्तीने लादली गेली आहे. साम्यवाद प्रस्थापित करताना त्यांना ही भीती घातली गेली की, त्यांनी जर साम्यवादी विचारप्रणाली मानली नाही, तर त्यांना फासावर लटकविले जाईल आणि त्यामुळेच ते अजून ती निमूटपणे पाळीत आहेत. हे लक्षात ठेवले पाहिजे की, भयापोटी कोणतीच विचारप्रणाली मूळ धरू शकत नाही. एखादी विचारप्रणाली ग्रहण केली गेली परंतु कालान्तराने तिची धारणाशक्ती नष्ट झाली, तर त्या विचारप्रणालीचे पुढे काय होईल. या प्रश्नाचे उत्तर जोपर्यंत देता येणार नाही, तोपर्यंत ती लोकांच्या मनावर बिंबविण्यात काहीच अर्थ नाही. कारण मनोभूमिकाच तयार केली गेली नसेल तर सत्तेची नेहमीच जरुरी भासेल. याच कारणास्तव मला नेहमी बुद्धाचे आकर्षण वाटते. बुद्धाची विचारसरणी ही लोकशाहीची विचारसरणी आहे.

अजातशत्रूला वज्जींना जिंकावयाचे होते. हे सांगण्यासाठी अजातशत्रूचा सरसेनापती बुद्धाकडे आला. बुद्ध त्याला म्हणाला की, राजा वज्जींचा पराभव करू शकणार नाही. कारण वज्जी जोपर्यंत आपल्या जुन्या पद्धतीला धरून राज्यशकट चालवीत आहेत, तोपर्यंत त्यांचा पराभव होणे शक्य नाही. बुद्धाने वज्जींच्या जुन्या पद्धतीचे उघड स्पष्टीकरण कोणत्या कारणामुळे केले नाही हे कळायला काही मार्ग नाही. परंतु तो ज्या बाबतीत बोलला ती बाब वज्जींच्या लोकशाहीप्रधान व गणतंत्री राज्यकारभारासंबंधीच होती यात मात्र संशय नाही. आणि म्हणूनच बुद्ध म्हणाला की, वज्जी जोपर्यंत आपल्या जुन्या पद्धतीप्रमाणे चालतील, तोपर्यंत ते कधीच पराजित होणार नाहीत. यावरून बुद्ध हा लोकशाहीचा मोठा पुरस्कर्ता होता हे उघड होते.

अध्यक्ष महाराज जर मला परवानगी देतील तर मला तुमच्या हेच निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, मी राज्यशास्त्राचा विद्यार्थी होतो, मी अर्थशास्त्राचाही विद्यार्थी होतो. एवढेच नव्हे तर मी अर्थशास्त्राचा प्राध्यापकही होतो. माझ्या जीवनातील बराच कालावधी कार्ल मार्क्स, साम्यवाद व इतर अनेक विषय ह्यांचा अभ्यास करण्यात घालविला. तसेच बुद्धाच्या धम्माचाही अभ्यास करण्यात मी बराच काळ व्यतीत केला. बुद्ध तत्त्वज्ञान व मार्क्सवाद ह्यांचा जेव्हा मी तौलनिक अभ्यास केला, तेव्हा मी ह्याच निष्कर्षाला पोहचलो की, जगातील एका फार मोठ्या समस्येच्या बाबतीत म्हणजेच जगात दुःख आहे व त्याच्या निवारणाचा एक निश्चित उपाय

आहे, ह्या बाबतीत बुद्धाचाच मार्ग सर्वोत्तम आहे, सुरक्षित आहे आणि भरभक्कम आहे. ह्याच कारणास्तव मी बौद्ध राष्ट्रांतील तरूण पिढीस सांगू इच्छितो की, त्यांनी बुद्धाच्याच वास्तववादी तत्त्वज्ञानावर विशेष भर दिला पाहिजे व त्यावरच आपले सारे लक्ष केन्द्रिभूत केले पाहिजे.

यदाकदाचित बौद्ध धर्मावर संकट उद्भवण्याचा प्रसंग आलाच, तर बौद्ध राष्ट्रांतील भिक्खुंनाच जबाबदार धरावे लागेल कारण मला तरी व्यक्तीशः असे वाटते की, ज्या भिक्खुनी तनमनधनाने आपली कर्तव्ये बजावयास पाहिजे, ती त्यांनी पाळली नाहीत असाच त्याचा अर्थ असेल. आज कोठे धर्मप्रचार होत आहे? बौद्ध धम्मप्रचाराची आज काय स्थिती आहे? भिक्खुचे खरे कर्तव्य धम्मप्रसार करणे असे आहे. तो भिक्खु आज काय करतो? आजचा भिक्खु खावून पिवून विहारात स्वस्थ राहतो. तो केवळ एकच वेळ जेवण घेतो यात शंका नाही. परंतु बहुतांशी त्याचा वेळ निव्वळ आळसातच जातो. थोडेफार तो वाचन करतो. परंतु बहुधा तो झोपाच काढतो. संध्याकाळी स्वतःचे मन संगीतात थोडे रिझवितो. हा मार्ग धम्मप्रसार करण्याचा खचितच नव्हे. मित्रहो, कोणावर टीका करण्याचा माझा हेतु नाही. परंतु धम्मात जर समाजात नवजागृती करण्याची नैतिक शक्ती असेल, तर धम्माची विचारसरणी तुम्ही सतत लोकांच्या कर्णपटलांवर आदळत ठेवली पाहिजे. धम्म तत्त्वज्ञान लोकांच्या कानात सतत ओतत राहिले पाहिजे. शाळेत मुलाला किती वर्षे घालवावी लागतात? तुम्ही मुलाला केवळ एका दिवसासाठी शाळेत पाठवीत नाही. त्यानंतर त्याला घरी ठेवून त्या मुलाने सारे शिक्षण ग्रहण करावे, सारे ज्ञान प्राप्त करून घ्यावे, अशी तुम्ही अपेक्षा करीत नाही. मुलगा दररोज शाळेत गेला, पाच तास तेथे तो बसला व सतत त्याने अभ्यास केला, तरच तो थोडेफार ज्ञान मिळवू शकतो, थोडी फार विद्या हस्तगत करू शकतो. आजचे भिक्खु एकही दिवस लोकांना विहारात बोलावित नाहीत किंवा एखाद्या विषयाचे शिक्षण देत नाहीत किंवा धर्मोपदेशही करीत नाहीत. माझ्या तरी पाहाण्यात अशी गोष्ट नाही.

मी एकदा सिलोनला गेलो होतो. भिक्खु कसा काय धम्मप्रचार करतात हे मला अवलोकन करावयाचे आहे, असे मी तेथील लोकांना सांगितले. त्यांनी मला सांगितले की त्यांच्याकडे ‘दान’ ही पद्धत आहे. नंतर मला समजले की, ‘वणाक’ या अर्थाने ‘दान’ या शब्दाचा उपयोग केला जातो. त्यांनी मला अकरा वाजण्याच्या सुमारास एका ठिकाणी नेले. तेथे टेबलाच्या आकाराची एक चौरस वस्तू होती. मी जमिनीवर बसलो. थोड्या वेळात एक भिक्खु आले. बऱ्याच उपस्थित स्त्री-पुरुषांनी

पाणी घेऊन त्यांचे पाय धुतले. नंतर ते चौरंगावर बसले. त्यांच्याजवळ हवा करण्यासाठी एक हातपंखा होता. ते काहीतरी पुटपुटले. पण काय पुटपुटले ते एका ईश्वरासच ठावूक! अर्थात त्यांनी ते धम्मप्रवचन सिंहली भाषेत केले असावे. पण ते सुद्धा केवळ दोन मिनिटेच! त्यानंतर ते निघून गेले.

आता, तुम्ही ख्रिश्चनांच्या चर्चमध्ये जावून बघा. तेथे काय होते? तेथे प्रत्येक आठवड्याला लोक एकत्र जमतात. तेथे ते प्रार्थना करतात. एखादा त्यांचा धर्मगुरू बायबलमधील एखाद्या विषयावर प्रवचन करून ख्रिस्ताने काय सदुपदेश केला हे समजावून सांगतो. त्या सदुपदेशाचे पुन्हा पुन्हा स्मरण करा, म्हणून लोकांना आवाहन करतो. तुम्ही हे ऐकून निश्चितच आश्चर्यचकित व्हाल की, ख्रिस्ती धर्माचा नव्वद टक्के भाग तत्त्वशः व रचनात्मकदृष्ट्या बौद्धधर्मापासूनच घेतला गेलेला आहे. तुम्ही रोममध्ये जा. तेथील मुख्य चर्च पाहा. तुम्हाला भरहूत येथील 'विश्वकर्मा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मंदिराची निश्चितच आठवण होईल.

व्हिशबिग्रे हा चीनमध्ये एक ख्रिश्चन मिशनरी होता. त्याने बौद्ध धर्मावर एक पुस्तकही लिहिले आहे. बौद्ध धर्म व ख्रिस्ती धर्म ह्यात असलेल्या कमालीच्या साम्याबद्दल त्याने आपले आश्चर्य प्रकट केले आहे. बाह्यात्कारी जरी तो बौद्धांनी ख्रिश्चनांची नक्कल केले असे म्हणण्याचे धारिष्ट्य करीत नसला तरी ख्रिश्चनांनी बौद्ध तत्त्वज्ञानाची उसणवारी केली हेही मान्य करण्यास तो तयार नाही. या बाबतीत सांगण्यासारखे खूप आहे.

काळ आता खूपच पालटलेला आहे. ख्रिश्चनांनी बौद्ध तत्त्वज्ञानाची नक्कल केली यात मुळीच वाद नाही. परंतु बौद्ध धम्मप्रसारासाठी खिश्चनांनी स्वीकारलेल्या मार्गाची बौद्धांनी नक्कल करण्यास कसलीच हरकत नसावी. जरी ते मार्ग बहकले तरी बुद्धाचा धम्म त्यांच्या मार्गदर्शनासाठी एखाद्या पोलिसासारखा सदैव उभा आहे. लोकांच्या मनावर ही गोष्ट बिंबविल्याशिवाय बौद्धधर्माचा होणारा ऱ्हास थांबविता येणार नाही.. आजसुद्धा बौद्ध राष्ट्रांत बौद्ध धर्माची अत्यंत वाईट स्थिती आहे. एवढे असूनही लोकांवर बौद्ध धर्माचा पगडा अजूनही कायम आहे यात संशय नाही.

जाता जाता मला एका अत्यंत मनोरंजक व महत्त्वपूर्ण बाबीची माहिती द्यावयाची आहे. ती मी ब्रह्मदेशात गेलो असताना पाहिली. तेथे मला एका परिषदेसाठी बोलावण्यात आले होते. त्यावेळेस तेथील लोकांनी मला ब्रह्मदेशात खेड्याची पुनर्रचना कशी केली जात आहे, हे दाखविण्यासाठी एका खेड्यात नेले. मला फार आनंद वाटला. तेथील एका कमिटीने खेड्याच्या पुनर्रचनेचा आराखडा तयार केलेला होता. त्या खेड्यातील सारे रस्ते नेहमीसारखे वाकडे तिकडे व अव्यस्थित होते.

त्यांना ते रस्ते सरळ करावयाचे होते. त्यासाठी त्या कमिटीने लोखंडी खांब रोवून सरळ असे दोर बांधले आणि रस्ते अशा प्रकारे सरळ केले पाहिजेत असे ठरविले. मला असे आढळले की कमिटीने आखल्याप्रमाणे रस्ता बऱ्याच लोकांच्या खाजगी जागेतून जात होता. त्यावर मी प्रश्न केला की, अशा परिस्थितीत कमिटी कसा काय रस्ता तयार करू शकेल? ज्यांच्या खाजगी जागेतून रस्ता जाणार त्या लोकांना त्याची भरपाई देण्यास कमिटीकडे तेवढा पैसा आहे का? तेव्हा त्यांनी मला सांगितले की, कोणीही पैशाची मागणी केलेली नाही. उलट रस्ता करण्यास जागा हवी असल्यास ती खुषीने घेतली जावी अशी प्रत्येकाने तयारी दाखविलेली आहे. हे ऐकून मी खरोखरीच आश्चर्यचकित झालो. हे कसे शक्य झाले? कारण माझ्या देशात नुकसान भरपाई केल्याशिवाय एखाद्याची थोडीशी जरी जमीन घेतली गेली तर रक्त सांडले जाते ; परंतु ब्रह्मदेशात तसे घडत नाही, असे का? ब्रह्मी लोक आपल्या मालमत्तेबाबतीत एवढे उदार कसे? त्यांना आपल्या जमिनीचा लोभ नाही का? त्यांना आपल्या मालमत्तेची काळजी वाटत नाही का? याचे कारण हेच की, बुद्धाचा 'सर्वम अनित्यम्' हा उपदेश त्यांच्या मनावर चांगला रूजलेला आहे. जगातील कोणतीच वस्तू नित्य नाही, शाश्वत नाही, तर ती नश्वर आहे, मग अशा अनित्य वस्तुसाठी भांडावे तरी कशाला? जमीन जर हवी आहे तर ती खुशाल घ्या, अशी त्यांची मनोधारणा बनलेली आहे.

बंधुभगिनींनो, इतःपर मी अजून काही सांगावे असे काहीच राहिलेले नाही. आपणास केवळ काही मुद्यांचे दर्शन घडवावे एवढीच माझी मनीषा होती. साम्यवादाच्या विजयदुंदुभीने तुम्ही बावरून जाऊ नका किंवा भुलून जाऊ नका किंवा दीपूनही जाऊ नका. तुम्ही जर बौद्ध विचारसरणीचा व तत्त्वज्ञानाचा एक दशांश भाग जरी आत्मसात करू शकलात तर साम्यवाद जे काही निर्माण करू इच्छितो, ते तुम्ही करुणा, न्याय व सद्भावना ह्यांच्या जोरावर घडवून आणू शकाल, यात तिळमात्र शंका नाही.

*(संदर्भ : काठमांडू येथे आयोजित करण्यात आलेल्या विश्व बौद्ध परिषदेच्या अखेरच्या दिवशी, म्हणजे, २० नोव्हेंबर १९५६ रोजी 'बौद्ध धम्मात अहिंसेचे स्थान' या विषयावर त्या परिषदेसाठी उपस्थित प्रतिनिधींना उद्‌बोधित करावे, अशी विनंती परिषदेचे अध्यक्ष डॉ. पी. जी. मलालाशेखर यांनी बाबासाहेबांना केली. बाबासाहेबांनी ती स्विकारली. परंतु उपस्थित प्रतिनिधींपैकी बहुसंख्य प्रतिनिधींनी मात्र बाबासाहंबांनी 'बुद्ध की कार्ल मार्क्स' या विषयावर बोलावे असा आग्रह केला. शुद्धलेखन मूळ लेखाबरहुकूम)*

# उजळणी-२

## महात्म्याचा आकृतिबंध

■ **रा. ग. जाधव**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत विचारपरिवर्तन आणि समाजपरिवर्तन यांचे परस्परसंबंध नेमके कसे होते व आहेत, हे सांगणे सोपे नाही. महाराष्ट्रात, किंबहुना अवघ्या भारतातच, आधुनिकता किंवा तिचे भान निर्माण झाले, ते सामाजिक स्थित्यंतराच्या नैसर्गिक प्रक्रियेतून नव्हे! समाजाच्या भौतिक-आर्थिक व्यवस्थेत बदल होत जाऊन त्यांच्या आगेमागे सामाजिक परिवर्तनाचे विचार निर्माण होत राहिले, अशी स्थिती आपल्याकडे दिसत नाही. आधुनिक जीवनाची भारतीयांना झालेली पहिली जाणीव ही आघातजन्य होती. पारंपरिक समाजावर पश्चिमी समाजाने केलेला तो कठोर आघात होता. आघातजन्य गोष्टी या अनेकदा विस्कळीत, विसंगत व विपरितही ठरू शकतात. आपल्या प्रबोधन विचाराची स्थिती काहीशी अशीच ठरली. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून भारतात ब्रिटिश सत्ता स्थिर होऊ लागली आणि पन्नास-पाऊणशे वर्षांच्या अल्पकाळातच ती सत्ता येथे दृढमूल झाली. या परकीय सत्तेने नव्या शासनाबरोबरच एक नवी संस्कृतीही येथे आणली. ही नवी संस्कृती ज्या जीवनमूल्यांनी भारलेली होती, ती जीवनमूल्ये येथील समाजशील व्यक्तींना अपूर्व वाटली. आपल्या पारंपरिक समाजाच्या तुलनेने ही पश्चिमी जीवनमूल्ये अधिक न्याय्य, अधिक प्रगतिकारक असल्याचे त्यांना दिसून आले. त्या जीवनमूल्यांचा एक अनावर मोह येथील समाजमनस्क व्यक्तींना वाटू लागला. त्यामागील ''ईश्वरी योजना'' चा साक्षात्कारही काहींना झाला. राजा राममोहन रॉय हे भारतीय प्रबोधनाचे जनक मानले गेले, याचे कारण आधुनिक भारताच्या सर्वंकष प्रबोधनाची व्यापक जाणीव त्यांना पहिल्यांदा झाली. तथापि या जाणिवेतही विचार व समाजव्यवस्था यांच्यातील नैसर्गिक क्रमाचा अभाव कायम होता. बदलत्या भौतिक परिस्थितीतून विचार निर्माण व्हावेत व त्यांनी पुन्हा परिस्थितीला इष्ट वळण देण्याचा प्रयत्न करावा, हा प्रकार इथे घडला नाही. भारतीय प्रबोधन व प्रबोधनकार खऱ्या अर्थाने

परिस्थितीची अपत्ये होती, असे दिसत नाही. ती पश्चिमी विचारांची अपत्ये होती. याच परंपरेत महात्मा जोतीराव फुले हे मोडतात. जोतीरावांनी महाराष्ट्रापुरते सर्वंकष प्रबोधनाचे स्वप्न पहिल्यांदा पाहिले हे खरेच, पण त्या स्वप्नालाही वर सांगितल्याप्रमाणे ऐतिहासिक मर्यादा होतीच. १८२७ ते १८९० हा त्यांचा जीवनकाल म्हणजे त्या स्वप्नाच्या परिपूर्तीसाठी त्यांनी अहोरात्र केलेला झगडा होय. रात्रंदिवस युद्धाचा प्रसंग अनुभवणारा, निष्ठेने आणि आनंदाने अनुभवणारा, हा महापुरुष होता. एका सामान्य माळी कुटुंबात जन्माला येऊन असामान्य असा महात्मा ठरलेल्या जोतीरावांच्या या कर्तृत्वाचे नेमके कारण सांगणे कठीण आहे. थोरांची थोरवी हे एक सनातन रहस्य असते. थोरपणाचा उद्गम कसा होतो, अशी माणसे कोणत्या बोधिवृक्षाखाली केव्हा बसतात आणि त्यांना आपल्या जीवितकार्याचा साक्षात्कार कसा होतो, हे समजणे वा समजावून देणे अवघडच असते. जोतीराव याला अपवाद नाहीत.

पण जोतीरावांच्या काळाचा आणि व्यक्तिमत्वाचा विचार करताना एक गोष्ट लक्षात येत जाते. सामान्यत्वाकडून असामान्यत्वापर्यंत त्यांनी जी वाटचाल केली, तिच्यात एक खास मराठी असा आकृतिबंध दृग्गोचर होऊ लागतो. ऐन तरुणपणी जोतीराव एका ब्राह्मणमित्राच्या लग्नाच्या वरातीत सामील झाले व या कारणाने त्यांचा भर वरातीत निषेध करण्यात आला. सामाजिक दृष्टीने जे निषिद्ध होते, ते त्यांनी नकळत केले होते, म्हणून! निषेधाचा असा आघात झाल्यावरच जोतीरावांतील सामान्य माणूस खडबडून जागा झाला. सामान्य माणसाचे सामान्यपणे जगण्याचे जे सामान्य स्वप्न असते, त्यालाच या प्रसंगाने तडा गेला. सामान्यांची स्वप्ने जेव्हा भंगतात, तेव्हा त्यातून असामान्यत्वाचा जन्म होतो. हा आकृतिबंध महाराष्ट्राच्या मध्ययुगीन इतिहासातही दिसून येतो. ज्ञानेश्वरादी भावंडांना एक सर्वसामान्य जीणेच जगण्याची कांक्षा होती. संत तुकारामालाही तशी आणि तेवढीच अपेक्षा होती. पण दोहोंचाही सामाजिक निषेध करण्यात आला. अशा निषेधाने ''चित्त दुखावले'' जाणे हा मानवी स्वभावच आहे. अशी दुखावलेली मने जपतच ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' लिहिली, नामदेवाच्या विठ्ठलभक्तीच्या संप्रदायाला साथ दिली आणि मराठी संस्कृतीचा पाया घातला. तुकारामाला गीतेवर भाष्य लिहिण्याची इच्छा होती. कदाचित ज्ञानेश्वरमाऊलीच्या आदर्शाला पुढे ठेऊनच भाष्य लिहिण्याचे निरागस स्वप्न त्यांनी बाळगले असावे! त्यात निषिद्ध असे काय असावे? पण तरीही वह्यांचे जलदिव्य त्यांना करावेच लागले. त्यातूनच आत्मोन्नतीसाठी आत्मपर रचनेचा मार्ग त्यांना पत्करावा लागला. या मार्गाने ते शेवटी संतत्वापर्यंत जाऊन पोहोचले. जोतीरावांच्या

जीवनात तरी यापेक्षा वेगळे असे काय घडले? त्यांचाही महात्मतेकडे मुरडलेला जीवनमार्ग एका सर्वसामान्य अपेक्षेच्या दारुण पराभवातूनच निर्माण झाला.

सामान्य निमित्त आणि त्याचा असामान्य परिणाम ही गोष्ट मनस्वी व्यक्तिमत्वांच्या बाबतीतच घडून येते. महाराष्ट्राच्या एकूणच परंपरेत अशी मनस्वी व्यक्तिमत्वाची माणसे अखंडपणे निर्माण होत राहिल्याचे दिसून येते. जोतीरावांनी आपल्या घणाघाती विचारप्रणालीत संत आणि त्यांचे साहित्य बाद ठरविले आहे हे खरे. पण हा त्यांच्या विशिष्ट विवेकशीलतेचाच एक नैसर्गिक घटक म्हणून आपण समजावून घेतला पाहिजे. थोर समाजमनस्क माणसे सामान्यतः विद्रोही प्रवृत्तीचीच असतात. ज्ञानेश्वरांनीही गीतापूर्व समग्र वैदिक परंपरा बादच ठरविली होती. त्याचप्रमाणे एका कुणब्याने हरिकीर्तन करून, नामस्मरण करून आणि अभिजात अभंगवाणी निर्माण करून संतत्व मिळविणे हे अपूर्वच होते. जोतीरावांच्या काळात जी सामाजिक परिस्थिती रूढ होती, तिचा प्रभाव त्यांच्या विचारप्रणालीवर पडणे स्वाभाविक होते, पण तरीही सर्वंकष विद्रोह हे त्यांच्या विचारप्रणालीचे वैशिष्ट्य अनन्यसाधारण होते. त्यांच्या पूर्वोत्तर काळात जे प्रबोधनकार होऊन गेले, त्यांच्या विचारसरणीत जोतीरावांइतका पूर्वपरंपरेचा समग्र विद्रोह दिसून येत नाही. जे जीर्ण आहे, जाचक आहे, जुने आणि जीवघेणे आहे, ते सर्व संपूर्णपणे टाकून द्यावयाचे आणि त्याच्या जागी नवे प्रस्थापित करावयाचे, ही जोतीरावांची भूमिका होती. ''सार्वजनिक सत्यधर्म'' हे त्यांच्या नव्या दर्शनाचे नाव होय. सार्वजनिक सत्यधर्म हा पूर्वकालीन सर्वधर्मकल्पना, सर्व नीतिकल्पना आणि सर्व सामाजिक कल्पना पुसून टाकण्यासाठी अवतरलेला धर्म होता. परंपरेने उभ्या केलेल्या ईश्वराच्या अनेक मूर्तीही सार्वजनिक सत्यधर्माला विसर्जित करावयाच्या होत्या. 'ईश्वर' हा शब्दही बाद करून त्याऐवजी ''निर्मिक'' या नव्या संकल्पनेची प्रस्थापना जोतीरावांना करावयाची होती. जो नवा सांस्कृतिक आकृतिबंध त्यांना रेखावयाचा होता, त्यासाठी त्यांना एक कोरी पाटीच हवी होती. ही कोरी पाटी त्यांच्या सर्वंकष विद्रोहवादाचेच एक ठसठशीत गमक होय.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात जोतीरावांचे जे अनन्यसाधारण वैशिष्ट्य होते, ते या कोऱ्या पाटीशी निगडित आहे. ही क्रांतिकारक कल्पना होती. हा केवळ ''रिव्होल्ट'' नव्हता, म्हणजे बंड नव्हते, तर ती एक ''रेव्होल्यूशन'' होती, एक क्रांती होती. जोतीरावांना सामाजिक क्रांती हवी होती. समाजात मूलगामी परिवर्तन हवे होते. असे स्थित्यंतर समाजात व्हावे, की जेणेकरून व्यक्तीची सत्यधर्मता ही समाजाच्या सर्व अंगोपांगांची सुसंगतपणे धारणा करू शकेल, समाजाला समृद्ध करू शकेल! जोतीरावांच्या या क्रांतिकारक स्वप्नाचे मर्म नेमकेपणाने सांगणे अवघड आहे.

आपल्या सामान्यत्वाला डिवचणारी सामाजिक निषेधाची आपत्ती त्यांच्या जीवनकार्याला प्रेरक ठरली हे खरे. हा आकृतिबंध महाराष्ट्राच्या इतिहासात पूर्वी एकदा घडूनही गेलेला आहे. तथापि समग्र क्रांती आणि समग्र विद्रोह या कल्पना मात्र आपल्या इतिहासात आढळत नाहीत. परंपरेशी अशी जोरदार धडक देण्याचे अवतारकार्य जोतीरावांपूर्वी आणि नंतर कोणी केले असेल असे वाटत नाही. असे कार्य करण्याची नेमकी प्रेरणा त्यांना कोठून मिळाली? या प्रश्नाचा मागोवा घेण्याचा आपण प्रयत्न करू.

जोतीरावांनी थॉमस पेन यांचे ''दे राईटस ऑफ मॅन'' हे पुस्तक वाचले होते. फ्रेंच राज्यक्रांतीच्या अपूर्व अशा ऐतिहासिक घटनेने भारावून गेलेल्या थॉमस पेनने त्या क्रांतीतून निष्पन्न झालेली मानवी व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांची आणि प्रतिष्ठेची प्रभावी बाजू आपल्या पुस्तकातून विशद केली आहे. थॉमस पेनचे व्यक्तिमत्व आणि जोतीरावांचे व्यक्तिमत्व यांत कुठेतरी साम्य असले पाहिजे. त्या दोहोंच्या मनांचा सूर मात्र जुळून आला. आपल्याला मानवी जीवनाचे आणि समाजाचे अंतिम सत्य समजले आहे आणि त्या सत्याचा सर्वस्वाने पुरस्कार केला पाहिजे, त्यासाठी कसल्याही प्रकारची तडजोड करण्याची गरज नाही, अशा प्रकारचा एक आत्मप्रत्यय थॉमस पेनमध्ये होता. जोतीरावांच्या विचारांत आणि कार्यात त्याच प्रकारचा आत्मप्रयत्न दिसून येतो. सामाजिक रचनेचे आणि प्रगतीचे जे स्वरूप आपणांस जाणवले आहे, ते निर्भयपणे प्रतिपादन करणे, जमेल तसे आणि शक्य असेल त्या भाषेत ते व्यक्त केले पाहिजे अशी थॉमस पेनची दृष्टी होती. तशीच दृष्टी जोतीरावांच्यातही आढळून येते. कदाचित, थॉमस पेनच्या प्रभावातूनच जोतीरावांच्या विचारसरणीतील अटीतटीचा युक्तिवाद, खंडनमंडनाची तीव्र आसक्ती आणि पुष्कळदा घणाघाती प्रतिपादनाची शैली निर्माण झाली असावी. भारतीय परंपरेत एखादा थॉमस पेन नव्हता आणि नाही. निदान जोतीरावांना तरी तसा कुणी आढळून आला नाही. म्हणूनच जोतीरावांच्या अपूर्व क्रांतिकारकतेचे रहस्य हे पश्चिमी संस्कृतीच्या आकृतिबंधात शोधावे लागेल. फ्रेंच राज्यक्रांती आणि अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध या दोन्ही घटनांतून त्या आकृतिबंधाची जाणीव जोतीरावांना झाली असली पाहिजे. यातूनच एक नवा क्रांतिकारक धर्मविचार उभा करण्याची प्रेरणा त्यांना लाभली असावी.

जोतीरावांच्या य नव्या धर्मविचारांचे स्वरूप काय होते? सार्वजनिक सत्यधर्म या त्यांच्या प्रणालीचे नेमके वैशिष्ट्य काय? या प्रश्नांची उत्तरे शोधताना काही गोष्टी लक्षात येतात. जोतीरावांनी ''धर्म'' ही संज्ञा किंवा संकल्पना आणि ''समाज'' ही

संज्ञा किंवा संकल्पना यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला. आपल्याकडे धर्म आणि समाज या दोन्ही संकल्पना एकमेकांत मिसळून गेल्या आहेत. स्वधर्माची जी पारंपरिक कल्पना आहे, तिच्यात सामाजिक आचार- विचार-उच्चारांचे संकेत अंतर्भूत आहेत. कुटुंबांचे कुलाचारही त्यात अंतर्भूत होतात. धार्मिक असणे याचा अर्थ केवळ विशिष्ट धार्मिक श्रद्धा व आचारविचार स्वीकारणे व अंमलात आणणे एवढाच नव्हे, तर विशिष्ट सामाजिक आचारविचार व संकेत पाळणे असाही होतो. भारतीय परंपरेत एकवट झालेल्या धार्मिक आणि सामाजिक परंपरा जोतीरावांच्या पुढे होत्याच. त्यांतील सामाजिक घटकांवर आणि त्यांच्या परिवर्तनावर त्यांचा भर होता. समाजातील कोणतीही व्यक्ती ही नैसर्गिक दृष्टीने दुसऱ्यासारखीच असते व म्हणून तिला समाजात वावरताना दुसऱ्या व्यक्तीइतके स्वातंत्र्य, समता आणि संधी मिळाली पाहिजे, असे त्यांचे मत होते. यासाठी समानतेवर आणि व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांवर अधिष्ठित असलेली सामाजिक रचना त्यांना निर्माण करावयाची होती. यासाठी जे अडथळे त्यांना जाणवत होते, ते मुख्यतः तथाकथित धार्मिक किंवा दैवी कल्पनांच्या स्वरूपाचे होते. सामजिक जातिभेद, उच्चनीचता आणि त्यांच्या अनुषंगाने येणारी सर्वांगीण स्वरूपाची सांस्कृतिक विषमता यांचा मुख्य आधारस्तंभ तथाकथित धर्मकल्पना होय, असा जोतीरावांचा समज होता. त्यामुळेच त्यांनी धर्मकल्पनांचा हा अडथळा दूर करण्यासाठी त्या कल्पनांच्या पुरस्कर्त्या वर्गावर म्हणजे ब्राह्मणवर्गावर टीकेची झाडे उठविली. त्याचबरोबर आपला सार्वजनिक सत्यधर्म उभा करताना त्यात समतापूर्ण समाज आणि त्याचे नैतिक आणि धार्मिक अधिष्ठान यांची जुळणी करण्याचा प्रयत्न केला. धर्म हा सामाजिक कल्पनांनी उभारता येत नाही, हे दुर्दैवाने खरे आहे, तसेच केवळ नीतिकल्पनांनीही धर्मकल्पना निर्माण होऊ शकत नाही. जोतीरावांनी नवीनच उभा केलेला सार्वजनिक सत्यधर्म हा एक लौकिक स्वरूपाचा (सेक्युलर) सामाजिक धर्म होता. असा धर्म हा धर्माच्या खऱ्या कल्पनांना आव्हान देऊ शकत नाही. किंवा त्यांचा पर्यायही ठरू शकत नाही हेही दुर्दैवाने खरे आहे. त्यामुळेच सामाजिक अधिष्ठानावर उभारलेला धर्म खऱ्याखुऱ्या धर्मकल्पनांना खरेखुरे आव्हान निर्माण करू शकला नाही. सार्वजनिक सत्य आणि नीती या गोष्टी टिकवून धरण्यासाठी एका व्यापक जीवनदर्शनाची गरज असते. काट्याने काटा काढावा, त्याप्रमाणे धर्मानेच धर्माचा काटा काढावयाचा असतो; कोणत्याही सामाजिक विचारप्रणालीने धर्माचा काटा काढता येत नाही. त्याचप्रमाणे कोणतीही सामाजिक प्रणाली केवळ नीतिविचारांनी बदलता येत नाही. धर्म, नीती व समाज यांच्या

सर्वांगीण परस्परसंबंधांचे सुसंगत दर्शन उभे करणारे तत्वज्ञान व दर्शन उभे करता आले नाही; तर त्या तीनही गोष्टी परस्परांच्या आधारे टिकविताही येत नाहीत व परस्परांनी छेद देऊन त्या बादही करता येत नाहीत. शिवाय समाजाच्या भौतिक परिस्थितीतच वस्तुनिष्ठ बदल घडून येणेही आवश्यक असते. तेव्हा, जोतीरावांची क्रांतिकारक विचारसरणी याबाबतीत कमी पडली असे म्हणण्यापेक्षा, ही उणीव एकूणच भारतीय प्रबोधन विचारात अंगभूतपणे होती, असेच म्हटले पाहिजे. भारतीय प्रबोधन चळवळीची शोकांतिका इथेच आहे.

जोतीराव आपल्यातून गेल्याला आज जवळ जवळ नव्वद वर्षे झाली. या दीर्घ काळात भारतीय सामाजिक प्रबोधनाची जी वाटचाल घडून आली, ती केविलवाणी आहे. जोतीरावांनी जे स्वप्न पाहिले होते, ते जवळ जवळ सर्वथा भंगल्याचेच दिसून येईल. जोतीरावांच्या विचारप्रणालीचा पराभव ही काही अपवादात्मक गोष्ट नव्हे. कोणतीही अभिजात आणि अस्सल विचारप्रणाली पराभूत करण्याची स्खलनशीलता कोणताही समाज नेहमीच प्रकट करीत असतो, असा इतिहास आहे. पण यशापशयाचे हे गणित, खरे तर, थोर व्यक्तींच्या जीवनकार्याला आणि विचारप्रणालीला लागू करणेही गैर आहे. जोतीराव हे आपले सर्वस्वी ''हरपलेले श्रेय'' आहे, असे मला वाटत नाही. जोतीरावांचे श्रेय हिरावून घेणारी एक ऐतिहासिकताही आहे. तिचे काहीसे दिग्दर्शन मी वर केलेले आहे. उदाहरणार्थ, भौतिक-आर्थिक परिस्थितीतील बदल हे सामाजिक प्रबोधनाचे किंवा परिवर्तनाचे खरे आरंभबिंदू असतात. तसेच ते सामाजिक परिवर्तनाला दीर्घकाळ तगवून ठेवणारे त्याचे शक्तिदायी स्त्रोतही असतात. महात्मा फुल्यांसकट सगळ्या भारतीय प्रबोधनकारांना अशा ऐतिहासिक परिस्थितीचा लाभ झाला नाही. प्रबोधनकारांची दुसरी मर्यादा भारतीय परंपरेतील धर्म आणि समाज या दोन संकल्पनांतील व्यवच्छेदक सीमारेषेच्या अभावामुळे निर्माण झाली. आपल्याकडे समाजसुधारणा करणाऱ्यांना धर्मसुधारणा करण्याचे कार्य स्वीकारावे लागले आणि धर्मसुधारणा करणाऱ्यांना सामाजिक कल्पनांशी झगडावे लागले. त्यामुळे खरी धर्मसुधारणा आणि खरी समाजसुधारणा यांचे खरे स्वरूप कधीच सिद्ध होऊ शकले नाही. धर्म आणि समाज यांचा समन्वय करण्याच्या आपत्तीमुळे एकूणच सामाजिक प्रबोधन हे विस्कळीत झाल्याचे दिसून येते. जोतीरावांच्या विचारप्रणालीला त्यांच्या मनस्वी व्यक्तिमत्वाचीही एक स्वाभाविक अशी मर्यादा होती. सर्वंकष विद्रोह हा पश्चिमी संस्कृतीचा विशेष रंगविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. तथापि भारतीय मनोभूमीत सर्वंकष क्रांती, सर्वंकष विद्रोह या कल्पना कधीच रुजू शकल्या नाहीत. सर्वंकष क्रांतिशीलता आणि सर्वंकष विद्रोहशीलता आता नव्या भारतीय

समाजात अंकुरू लागल्याची चिन्हे दिसत आहेत. ही चिन्हे शुभ की अशुभ हे भावी इतिहासच ठरवील. पण ही चिन्हे घेऊन अवतरणाऱ्या नव्या परिस्थितीत जोतीरावांची विचारप्रणाली अभ्यसनीय ठरावी.

तथापि जोतीरावांकडून ज्या प्रेरणा मिळतात, त्या मोलाच्या आहेत. सामान्य माणसाचे असामान्य अशा विचारवंतात रूपांतर होऊ शकते, याचा पुरावा त्यांच्या जीवनातून मिळतो. एक स्वतंत्र व नवा सामाजिक धर्म किंवा एक ''यूटोपिया'' उभा करण्याचे सामर्थ्य त्यांनी प्रकट केले, ही अतिशय प्रेरक गोष्ट आहे. महानता आणि महात्म्य यांची मुळे सामान्यांच्या मनस्वी विचारकोषांतच असतात. सामान्यांच्या स्वप्नातूनच असामान्य स्वप्नांचा जन्म होत असतो, ही गोष्ट समाजाला वारंवार पटवून देणे आवश्यक असते. जोतीरावांचा जो वारसा चालवावा लागणार आहे, तो या सामान्यांच्या स्वप्नांची जपणूक करण्याचाच आहे. दुर्दैवाने आपल्या समाजात सामान्यत्वाची निष्ठाच आज दिसेनाशी झाली आहे. तिचे पुनरुज्जीवन करणे हे जोतीरावांचे खरे स्मारक ठरेल.

*(टीप : शुद्धलेखन मूळ लेखाबरहुकूम)*

---

## 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील लेखनाचे संदर्भ


- https://www.gatesnotes.com/work/accelerate-energy-innovation/reader/three-tough-truths-about-climate
- https://www.forbes.com/sites/arielcohen/2021/01/11/bill-gates-backed-climate-solution-gains-traction-but-concerns-linger/
- https://frontline.thehindu.com/environment/bill-gates-climate-change-controversy/article70266082.ece
- https://www.theguardian.com/environment/2010/may/14/bill-gates-cloud-whitening-dangerous
- https://timesofindia.indiatimes.com/world/middle-east/just-a-drop-in-the-ocean-iran-linked-hackers-release-personal-details-of-over-2000-us-troops/articleshow/130621023.cms
- महात्मा फुले : साहित्य आणि चळवळ, संपादक – हरी नरके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षि शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, प्रकाशक – प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई – ४११ ०२१, २००६, पृ. क्र. १३९–१४६.
- एस. ए. डांगे : एक इतिहास, लेखक: रोझा देशपांडे, बानी देशपांडे, विचार भारती प्रकाशन, दादर, मुंबई – ४११ ०१४, २०१६, पृ. क्र. ७१–१२३, १५२–१६३.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे – भाग ३: १९४६ ते १९५६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर – लेखन व भाषणे, खंड १८, भाग ३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र–साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २००२, पृ. क्र. ५४२–५५४.

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

## OTHER PUBLICATIONS

*Marathi Monthly:*

*ARTHABODH-PATRIKĀ*,
(Subscription Rs. 100/- per year)

*Books and Booklets:*

1. *Bhāratāteel Lok-Sankhyā Wādhichā Prashna: Santati-Niyamanāchee Jaruree Wa Tyāteel Yash,* (The Problem of Population Growth in India: The Need for Family Planning and its Success) (in Marathi) by Kumudini Dandekar, Pp. 60, Rs. 30/-.

2. *Compulsory Primary Education - Opportunities and Challenges,* Second Edition, (in English and Marathi), by Jayakumar Anagol, Pp. 54 and 61, Rs. 30/-.

3. *Shodh Ghetay Tay Shikshan,* (To Searches is Education), (in Marathi), by Ramesh Panse, Pp. 67, Rs. 50/-.

4. *Kartā-Karvitā, Adhunik Mendu-Sanshodhan va Aple Jeevan,* by Ramesh Panse, Rajyashree Kshirsagar, Anita Belhekar-Deshmukh, Pp. 242, Rs. 350/-.

5. *Governance, Supervision and Market Discipline: Lessons from Enron* by Jayanth R. Varma, Pp. 87, Rs. 100/-. Reprint from (*Journal of Indian School of Political Economy,* Vol. XIV, No. 4, October-December 2002)

6. *Poverty in India,* (Reprint 2008), by V.M. Dandekar and N. Rath, Reprinted by Books for Change Bangalore, Pp. vi+140, Price Rs 200/-

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**

# वाचनीय पुस्तके

**DARK SECRETS : POLITICS, INTRIGUE AND PROXY WARS IN KASHMIR, Iqbal Chand Malhotra, Bloomsbury India, New Delhi : 110070, 2021, Pp. XXII + 275, MRP Rs. 599/-.**

घडून गेलेल्या घटनांचा साद्यंत वृत्तान्त म्हणजे इतिहास, ही व्याख्या आता सगळ्यांनाच पाठ झालेली आहे. परंतु, इतिहासातील सत्य कसे शोधायचे, हा एक जटिल प्रश्न ठरतो. किंबहुना, निखळ आणि निरपवाद असे काही 'सत्य' इतिहासात खरोखरच असते का, हादेखील इतिहासतज्ज्ञांच्या वर्तुळात आताशा अतिशय गंभीरपणे चर्चिला जाणारा मुद्दा आहे. तशातच, इतिहासातील काही घटनांसंदर्भात विश्वसनीय असा दस्तऐवजीकरण झालेला पुरावा तर सापडत नाही; परंतु, काही घटनांच्या उलगडत जाण्याद्वारे त्यांच्या मुळाशी नांदणाऱ्या संभाव्य कार्यकारणभावांचा काहीसा अंदाज येतो, असाही अनुभव गतेतिहासाचे आकलन करून घेण्यासाठी प्रवृत्त झालेल्या विचक्षक आणि जिज्ञासू अभ्यासकांना येत राहतो. अशा वेळी, मग, हाताशी असलेले अधिकृत व दस्तऐवजीकरण झालेले दाखले आणि दस्तऐवजीकरणाच्या फटीतून निसटून गेलेले काही घटनांश यांच्या, सर्जनशील कल्पकतेद्वारे सांधलेल्या जोडणीद्वारे, गतकालाची काही एक रांगोळी पूर्ण करणे भाग पडते. इक्बालचंद मलहोत्रा यांचा हा, आकाराने लहानसाच असणारा, ग्रंथ आहे नेमका त्याच प्रकृतीचा. हिंदुस्थानातून पाय बाहेर काढते वेळी ब्रिटिशांनी त्याची केलेली दोन छकले ही अशीच एक विलक्षण वादग्रस्त, बहुचर्चित आणि जिचे कोडे अजूनही नीट उलगडलेले नाही, अशी रक्तलांछित घटना होय. आजही ज्या काश्मीरप्रश्नाची जखम भळभळते आहे तिची पाळेमुळेदेखील त्याच फाळणीशी अभिन्नपणे गुंफलेली आहेत. फाळणीवर शिक्कामोर्तब जरी १९४७ साली झालेले असले तरी, वायव्य सरहद्द प्रांत आणि गिलगिटचा परिसर आपल्याच अंमलाखाली राहावा यासाठी ब्रिटिश व्यूहरचनाकारांनी थेट १९व्या शतकापासून जारीने राबविलेल्या धोरणांचा तो केवळ अंतिम परिपाक होता, हे, परिस्थितीजन्य दाखल्यांनिशी लेखकाने इथे सूचित केलेले आहे. आणि त्या कुटील नीतीच्या मुळाशी तहान होती ती गिलगिट तसेच वायव्य सरहद्द प्रांतात मुबलक प्रमाणात भूगर्भाखाली उपलब्ध असणाऱ्या समृद्ध युरेनियमच्या साठ्यांवर नियंत्रण राखण्याची. फाळणी आणि काश्मीरचा प्रश्न हा ब्रिटन-अमेरिका-रशिया या तीन महासत्तांच्या अण्वस्त्रविषयक इरेसरीच्या घावडावांची कशी निष्पत्ती ठरते, याचे विवरण करणारा हा दस्तऐवज काश्मीरच्या प्रश्नाबाबच्या आपल्या आकलनाची समूळ पुनर्मांडणी करतो.

**RNI Regn. No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model colony Post Office Pune,**
**On 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग-व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राकिय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे – ४११ ०३०. येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**